रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

वर्ष १६ • अंक ३३९
www.ramprahar.com

बुधवार, २६ जून २०२४ • पाने ८ • किंमत ₹२

## लोकसभा अध्यक्षपदासाठी आज निवडणूक



**नवी दिल्ली** : लोकसभा निवडणुकीत भाजपप्रणित राष्ट्रीय लोकशाही आघाडी (एनडीए)ला बहुमत मिळाल्यानंतर केंद्रात तिसर्‍यांदा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली सरकार स्थापन झाले. त्यानंतर संसदेच्या पावसाळी अधिवेशनाला सुरुवात झाली असून मंगळवारी अधिवेशनाचा दुसरा दिवस होता. सर्व नवनिर्वाचित खासदारांचा शपथविधी झाला. आता लोकसभा अध्यक्षपदासाठी बुधवारी (दि. २६) सकाळी ११ वाजता निवडणूक होणार आहे. एनडीएकडून ओम बिर्ला यांनी पुन्हा एकदा लोकसभेच्या अध्यक्षपदासाठी अर्ज दाखल केला आहे, तर इंडिया आघाडीकडून काँग्रेस खासदार के. सुरेश यांना उमेदवारी देण्यात आली आहे. दरम्यान, तृणमूल काँग्रेसने नाराजी व्यक्त करीत काँग्रेसकडून विश्वासात घेतले नसल्याचा आरोप केला आहे. त्यामुळे पहिल्याच अधिवेशनात इंडिया आघाडीत बिघाडी सुरू झाल्याचे चित्र आहे.

### अंतरंग

'शेतकर्‍यांना पीककर्ज देताना हात आखडता घेऊ नये'/२

कर्जतमध्ये पूर्ववैमनस्यातून हाणामारी; एक जण गंभीर/५

अफगाणिस्तानची वर्ल्डकप सेमी फायनलमध्ये धडक/८

# शिक्षक, पदवीधर मतदारसंघ निवडणुकीसाठी आज मतदान

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्य विधान परिषदेच्या चार जागांसाठी बुधवारी (दि. २६) मतदान प्रक्रिया होणार आहे. मुंबई शिक्षक व पदवीधर, कोकण पदवीधर आणि नाशिक शिक्षक मतदारसंघात ही निवडणूक होत आहे. सकाळी ७ ते सायंकाळी ६ अशी मतदानाची वेळ आहे. यासाठी राजकीय पक्षांबरोबरच प्रशासकीय यंत्रणा सज्ज झाली आहे.

मुंबई शिक्षक मतदारसंघात ज. मो. अभ्यंकर (ठाकरे गट), शिवनाथ दराडे (भाजप), सुभाष मोरे (शिक्षक भारती) या उमेदवारांमध्ये प्रमुख लढत आहे. या मतदारसंघात एकूण १५ हजार ८३९ मतदार आहेत.

मुंबई पदवीधर मतदारसंघात ठाकरे गटाचे विधान परिषद आमदार अनिल परब विरुद्ध भाजपचे किरण शेलार असा मुख्य सामना आहे. या मतदारसंघातील मतदारांची संख्या एक लाख २० हजार ६७३ इतकी आहे.



कोकण पदवीधर मतदारसंघात भाजपकडून विद्यमान आमदार निरंजन डावखरे पुन्हा एकदा रिंगणात आहेत. त्यांच्यासाठी मनसेचे उमेदवार अभिजित पानसे यांनी अर्ज मागे घेतला. दुसरीकडे रमेश कीर हे काँग्रेसचे उमेदवार आहेत. या मतदारसंघात इतरही उमेदवार असले तरी मुख्य लढत डावखरे आणि कीर यांच्यात आहे. येथे एकूण दोन लाख २३ हजार २२५ मतदार आहेत.

नाशिक शिक्षक मतदारसंघात शिवसेनेचे किशोर दराडे, राष्ट्रवादीचे महेंद्र भावसार, ठाकरे गटाचे संदीप गुळवे, अपक्ष विवेक कोल्हे यांच्यासह अन्य उमेदवार निवडणूक लढवत आहेत. या ठिकाणी ६९ हजार ३६८ मतदारांची नोंद झालेली आहे.

मतदान प्रक्रियेसाठी प्रशिक्षण दिलेल्या अधिकारी आणि कर्मचार्‍यांची नियुक्ती करण्यात आली आहे तसेच मतदान केंद्रांवर मूलभूत सोयीसुविधांची पूर्तता केली गेली आहे.

मतदानाच्या दिवशी जे मतदार मतदान केंद्रावर त्यांची ओळख पटविण्यासाठी छायाचित्रासह मतदार ओळखपत्र सादर करू शकत नाही अशांना निवडणूक आयोगाने निर्धारित केलेल्या ओळखपत्रांपैकी कोणतेही ओळखपत्र सादर करता येईल, जे ग्राह्य धरण्यात येणार आहे. दरम्यान, या चारही मतदारसंघातील मतमोजणी १ जुलै रोजी होणार आहे.

# मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांनी घेतला खरिपाचा आढावा

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यातील शेतकरी, नागरिक यांना नैसर्गिक आपत्ती, शेती नुकसानभरपाईसाठीच्या मदतीचे वाटप ३० जूनपर्यंत पूर्ण करावे, असे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मंगळवारी (दि. २५) येथे दिले. शेतकर्‍यांना वेळेवर मदत दिली पाहिजे. क्षेत्रिय अधिकार्‍यांनी शेतकर्‍यांसाठी घेतलेल्या निर्णयांची अंमलबजावणी तातडीने करावी, असेही मुख्यमंत्र्यांनी जिल्हा प्रशासनाला निर्देश दिले, तर खते, बियाणे याचे लिंकिंग करणार्‍या विक्रेत्यांबरोबरच कंपन्यांवरही कडक कारवाई करण्याच्या सूचना कृषी विभागाला दिल्या.



सह्याद्री अतिथीगृह येथे झालेल्या बैठकीत राज्यातील खरिपाचा आढावा मुख्यमंत्र्यांनी घेतला. या वेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित पवार, महसूलमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील, सहकारमंत्री दिलीप वळसे-पाटील, कृषीमंत्री धनंजय मुंडे, पणनमंत्री अब्दुल सत्तार, ग्रामविकासमंत्री गिरीश महाजन, मृद व जलसंधारणमंत्री संजय राठोड, मुख्य सचिव डॉ. नितीन करीर, मुख्यमंत्र्यांचे अतिरिक्त मुख्य सचिव आय.एस. चहल, मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव विकास खारगे, कृषी विभागाच्या प्रधान सचिव व्ही.राधा, कृषी आयुक्त रावसाहेब भागडे यांच्यासह विविध विभागांचे अपर मुख्य सचिव, प्रधान सचिव, सचिव उपस्थित होते. सर्व विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, जिल्हा कृषी अधिकारी दूरदृष्यप्रणालीच्या माध्यमातून उपस्थित होते.

मुख्यमंत्री शिंदे म्हणाले, शेतकरी देशाचा कणा आहे. त्यामुळे राज्य शासनाने शेतकर्‍यांच्या समृद्धीसाठी घेतलेल्या निर्णयांची तातडीने अंमलबजावणी करण्यात यावी. राज्य शासन शेतकर्‍याला वार्‍यावर सोडणार नाही, असे सांगतानाच बांबू लागवड क्षेत्राची वाढ करण्यासाठी जिल्हाधिकार्‍यांनी प्रयत्न करणे आवश्यक आहे. कृषी विद्यापीठांनी नवीन संशोधनावर भर द्यावा. ज्या भागात २५ टक्क्यांपेक्षा कमी पाऊस झाला आहे असे तालुके, जिल्ह्यांवर विशेष लक्ष केंद्रित करण्याच्या सूचनाही मुख्यमंत्र्यांनी दिल्या.

### राज्यातील शेतकर्‍यांना नुकसानभरपाईचे वाटप ३० जूनपर्यंत पूर्ण करण्याचे निर्देश

### खते, बियाण्यांचे लिंकिंग करणार्‍यांवर कठोर कारवाईच्या सूचना

बोगस बियाणे कंपन्यांवर कठोर कारवाई करावी. आपत्ती काळात शेतीच्या नुकसानीच्या पाहणीसाठी सॅटेलाईट तंत्रज्ञानाचा वापर करावा, असे आवाहन उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी केले. कृषी अधिकार्‍यांनी क्षेत्रिय स्तरावर जाऊन शेतकर्‍यांना मार्गदर्शन करावे, तर हवामान विभागाने जुलै महिन्यात ला निनामुळे जोरदार पाऊस होण्याचा अंदाज वर्तविला आहे. अशा परिस्थितीत आपत्कालीन यंत्रणा सज्ज करण्याच्या सूचना उपमुख्यमंत्री पवार यांनी दिल्या.

खरिपाच्या काळात शेतकर्‍यांना बियाणे खते व अन्य कृषी निविष्ठांचा तुटवडा भासू नये यासाठी कृषी विभागाने परिपूर्ण नियोजन केलेले आहे, मात्र साठेबाजी किंवा लिंकिंग होत असल्यास तशी तक्रार शेतकर्‍यांनी व्हॉट्सअ‍ॅपद्वारे ९८२२४४६६५५ या क्रमांकावर करावी, असे आवाहन कृषीमंत्री मुंडे यांनी केले.

यंदा खरिपाचे लागवडीखालील अपेक्षित क्षेत्र १४२.३८ लाख हेक्टर आहे. राज्यात २४.९१ लाख क्वि. बियाणे उपलब्ध असून १.५० लाख मे. टन युरिया व २५ हजार मे. टन डीएपी खतांचा संरक्षित साठा करण्यात आल्याची माहिती प्रधान सचिव राधा यांनी दिली.

### शुभेच्छा...




**नवी मुंबई : महाराष्ट्र शहर आणि औद्योगिक विकास महामंडळ मर्यादित अर्थात सिडकोचे नवनियुक्त सहव्यवस्थापकीय संचालक गणेश देशमुख यांचे आमदार प्रशांत ठाकूर यांनी अभिनंदन करून त्यांना पुढील यशस्वी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.**

### निवडक

#### अरविंद केजरीवाल यांचा तुरुंगातील मुक्काम वाढला

**नवी दिल्ली** : मद्य विक्री घोटाळा प्रकरणात अटकेत असलेले दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांचा तुरुंगातील मुक्काम आणखी वाढला आहे. केजरीवाल यांना राउज एवेन्यू न्यायालयाने जामीन मंजूर केला होता, मात्र उच्च न्यायालयाने या निर्णयाला दिलेल्या स्थगिती दिल्याने केजरीवालांनी सर्वोच्च न्यायालयाने याचिका सादर केली होती. मात्र जामिनावरील स्थगिती हटवण्यास सुप्रीम कोर्टाने सुनावणीत नकार दिला आहे.

#### पुणे पोर्श अपघात प्रकरणातील अल्पवयीन मुलाला जामीन मंजूर

**पुणे** : येथील कल्याणीनगर भागात मद्यधुंद अवस्थेत पोर्श ही महागडी कार चालवून दोघांना चिरडणार्‍या अल्पवयीन मुलाला जामीन मंजूर करण्यात आला आहे. हा मुलगा पुण्यातील प्रसिद्ध बिल्डरचा असून त्याची रवानगी बालसुधारगृहात करण्यात आली होती. मुलाची आत्या पूजा जैनची याचिका कोर्टाने स्वीकारत जामीन मंजूर केला. मुलाचे आई, वडील व आजोबा पोलीस कोठडीत असल्याने मुलाला आत्याच्या ताब्यात देण्यात येणार आहे.

## घाटकोपर होर्डिंग दुर्घटनेप्रकरणी अतिरिक्त डीजीपी निलंबित

**मुंबई : प्रतिनिधी**

काही दिवसांपूर्वी मुंबईतील घाटकोपरमध्ये पेट्रोल पंपावर होर्डिंग कोसळल्याची घटना घडली होती. या घटनेत ५०पेक्षा जास्त नागरिकांचा मृत्यू झाला होता. दरम्यान, या प्रकरणी आता मोठी कारवाई करण्यात आली आहे. राज्याचे अतिरिक्त पोलीस महासंचालक कैसर खालिद यांना निलंबित करण्यात आले आहे.

एएनआयने दिलेल्या वृत्तानुसार महाराष्ट्र सरकारने या संदर्भातील परिपत्रक जारी केले आहे. या परिपत्रकात कैसर खालिद यांना पुढील आदेशापर्यंत तत्काळ प्रभावाने निलंबित करण्यात येत असल्याचे म्हटले आहे तसेच जोपर्यंत हा लागू आहे तोपर्यंत त्यांना निर्वाह भत्ता, महागाई भत्ता आणि देय असलेले इतर भत्ते अदा केले जातील, असेही या परिपत्रकात नमूद करण्यात आले आहे.

### ग्रेट भेट...



**नवी दिल्ली : रायगड लोकसभा मतदारसंघाचे खासदार सुनील तटकरे यांनी देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची सहकुटुंब भेट घेतली आणि तिसर्‍यांदा पंतप्रधानपदी विराजमान झाल्याबद्दल त्यांना शुभेच्छा दिल्या.**

## पेपरफुटीप्रकरणी दुसर्‍या शिक्षकालाही पोलीस कोठडी

**लातूर : प्रतिनिधी**

देशभरात गदारोळ माजवणार्‍या 'नीट' परीक्षा पेपरफुटीचे लातूर कनेक्शन सोलापूर जिल्ह्यातील माढ्यापर्यंत पोहचले आहे. या प्रकरणी दोन शिक्षकांना पोलिसांकडून अटक करण्यात आली आहे. त्यापैकी जलीलखान पठाणला सोमवारी सात दिवसांची पोलीस कोठडी मिळाली होती, तर दुसरा आरोपी संजय जाधव याला अटक करून मंगळवारी (दि. २५) न्यायालयात हजर केले असता सहा दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे.

वैद्यकीय प्रवेश परीक्षा 'नीट' प्रकरणात आरोपी संजय जाधव हा सोलापुरातील माढ्याच्या प्राथमिक शाळेत गेल्या वर्षभरापासून उपशिक्षक म्हणून कार्यरत होता. जिल्हा परिषद शाळेत असणार्‍या उपशिक्षकाचे नाव नीट परीक्षा कनेक्शनमध्ये आल्याने माढा तालुक्याच्याच नव्हे; तर सोलापूर जिल्ह्याच्या शिक्षण विभागातही खळबळ माजली आहे. या प्रकरणी आरोपी संजय जाधव यास सहा दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. या घटनेत आरोपी संजय जाधव हा दिल्ली आणि लातूरमधील दुवा होता.



या प्रकरणी आतापर्यंत चार जणांविरोधात लातूरच्या शिवाजीनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल आहे. यातील जलील खान पठाण याला यापूर्वीच अटक झाली होती, तर फरारी संजय जाधव याला सोमवारी रात्री उशिरा अटक करण्यात आली. जाधवला मंगळवारी लातूर येथील न्यायालयात हजर आले असता पोलीस आणि दोन्ही बाजूच्या वकिलांचे म्हणणे ऐकल्यानंतर कोर्टाने आरोपीला सहा दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे.

#### पैसे घेऊन चालवायचे रॅकेट

लातूर येथे जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील उपशिक्षक संजय तुकाराम जाधव आणि त्याचा मित्र उपशिक्षक जलीलखा उमरखान पठाण हे दोघे पैसे घेऊन नीट परीक्षा उत्तीर्ण करण्याचे रॅकेट चालवत असल्याची माहिती एटीएस पथकाला समजल्यानंतर शनिवारी ते लातूरमध्ये दाखल झाले. पथकाने संबंधित दोघांची पडताळणी आणि चौकशी केली आणि त्यांच्यासह इतरांवर रविवारी रात्री उशिराने गुन्हा दाखल करण्यात आला. त्यानंतर दोघांनाही अटक करण्यात आली. या प्रकरणी अधिक तपास सुरू आहे.

## सीकेटी विद्यालयाच्या पराग सावंतची 'एअर इंडिया'त केबिन क्रू मेंबर म्हणून निवड

### लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्याकडून अभिनंदन



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या नवीन पनवेल येथील चांगू काना ठाकूर (सीकेटी) उच्च माध्यमिक विद्यालयाच्या पराग रामविजय सावंत या विद्यार्थ्याची एअर इंडिया (मुंबई) येथे केबिन क्रू मेंबर म्हणून निवड झाली आहे.

पराग सावंत या विद्यार्थ्यांने व्यावसायिक क्षेत्रात मिळविलेल्या या विशेष प्राविण्याबद्दल संस्थेचे चेअरमन, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, व्हाईस चेअरमन वाय.टी.देशमुख, सचिव डॉ. एस.टी. गडदे, प्राचार्य प्रशांत मोरे, पर्यवेक्षक अजित सोनवणे, स्वाती पाटील तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी त्याचे अभिनंदन केले आणि पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

## उत्तर रायगडात दुबार पेरणीचे संकट

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

एकीकडे दक्षिण रायगडमध्ये शेतकर्‍यांची भात लावणीची लगबग सुरू आहे. उत्तर रायगडमधील शेतकरी मात्र चिंतातूर आहे. पावसाआभावी अनेक ठिकाणी भातरोपांची उगवणच झालेली नाही. त्यामुळे दुबार पेरणी करण्याची वेळ शेतकर्‍यांवर आली आहे.

जिल्ह्यात साधारणपणे मे महिन्याच्या अखेरीस धूळवाफ्यावर भाताची पेरणी केली जाते. पाऊस पडेल या आशेवर पावसापूर्वीच ही पेरणी होत असते. पाऊस जर वेळेवर किंवा पुरेसा झाला नाही, तर भाताचे दाणे उन्हाच्या तडाख्याने तडकून फुटतात आणि हे दाणे रूजत नाहीत. अशा परिस्थितीत पुन्हा पेरणी करण्याशिवाय पर्याय नसतो. यंदा पाऊस वेळेवर दाखल झाला. सुरुवातीला चांगला बरसलाही, पण नंतर मात्र पावासाने ओढ दिली. अनियमित आणि अपुरा पाऊस पडत राहिला. उत्तर रायगडात काही ठिकाणी रुजवण झाली नाही. जिथे झाली तिथे रोपांची पुरेशी वाढ झालेली नाही. त्यामुळे शेतकर्‍यांसमोर दुबार पेरणीचे संकट उभे राहिले आहे.

एकीकडे जिल्ह्याच्या दक्षिण भागात मागील आठवड्यातच लावणीच्या कामांना सुरुवात झाली आहे, मात्र उत्तर भागात शेतकरी भातरोपांच्या प्रतीक्षेत आहेत. अनेक शेतकर्‍यांना दुबार पेरणी करणे क्रमप्राप्त झाले आहे.

जून आणि जुलै हे सर्वाधिक पावसाचे महिने असतात, मात्र या वर्षी जिल्ह्यात सामान्य पर्जन्यमानाच्या तुलनेत १२ टक्केच पाऊस झाला आहे.



# शेतकऱ्यांना पीककर्ज देताना हात आखडता घेऊ नये -मुख्यमंत्री

**मुंबई : प्रतिनिधी**

शेती हे महाराष्ट्राचे बलस्थान आहे. म्हणून शासन शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहे. बँकांनीही शेतकऱ्यांना अडचणीच्या काळात पाठबळ दिले पाहिजे. अल्प, अत्यल्पभूधारक शेतकऱ्यांना पीककर्ज देताना बँकांनी हात आखडता घेऊ नये, असे आवाहन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मंगळवारी (दि. २५) येथे केले. राज्यस्तरीय बँकर्स समितीच्या १६३व्या बैठकीत ते बोलत होते.



पीककर्ज देताना शेतकऱ्यांना सिबील स्कोअरची सक्ती केली जाऊ नये. राज्यातील जिल्हा सहकारी बँका तसेच प्राथमिक कृषी पतपुरवठा संस्थांचे बळकटीकरण यांना प्राधान्य दिले जावे, असा निर्णय या बैठकीत घेण्यात आला. या वेळी समितीने सादर केलेल्या २०२४-२५साठीच्या ४१ लाख २८६ कोटींच्या वार्षिक पत आराखड्यास मान्यता देण्यात आली. त्याचप्रमाणे जिल्हास्तरीय बँक सल्लागार समितीच्या बैठकीसाठी आरबीआय तसेच नाबार्डकडून समन्वय अधिकारी पाठवण्यात यावेत, असे निर्देशही देण्यात आले.

बैठकीस उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, महसूलमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील, कृषीमंत्री धनंजय मुंडे, सहकारमंत्री दिलीप वळसे-पाटील तसेच राज्याचे मुख्य सचिव डॉ. नितीन करीर, मुख्यमंत्र्यांचे अतिरिक्त मुख्य सचिव डॉ. आय.एस. चहल, मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव विकास खारगे, महसूल विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव राजेशकुमार, सहकार व पणन विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव अनुपकुमार, वित्त विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव ओ.पी. गुप्ता, नियोजन विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव राजगोपाल देवरा यांच्यासह विविध विभागांचे सचिव तसेच राज्यस्तरीय बँकर्स समितीचे अध्यक्ष तथा बँक ऑफ महाराष्ट्राचे कार्यकारी संचालक आशिष पांडे, रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचे प्रादेशिक संचालक अविरल जैन, सचिन शेंडे, नाबार्डच्या मुख्य व्यवस्थापक रश्मी दरड, विविध बँकाचे वरिष्ठ अधिकारी आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री म्हणाले की, महाराष्ट्र कृषीप्रधान आणि प्रगतीशील आहे. महाराष्ट्राने कृषी क्षेत्रातही अनेक यशस्वी प्रयोग केले आहेत. शेतकऱ्यांना प्राधान्य देणारे राज्य म्हणून महाराष्ट्राची ओळख आहे. दुर्दैवाने निसर्गाच्या अवकृपेमुळे त्यांच्यावर संकट आल्यास आम्ही शासन म्हणून त्याच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहिलो आहोत. त्यासाठी आम्ही एनडीआरएफच्या निकषाहून दुपटीने मदत केली आहे हेक्टर मर्यादाही वाढवली आहे. बँकांनी त्याला संकट काळात आर्थिक पाठबळ न दिल्यास त्याला अन्य मार्गाने पैसा उभा करावा लागतो. यातूनच आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल उचलावे लागते. शेतकरी जगला तरच आपण सगळे जगू, असेही ते म्हणाले.

बैठकीत उपमुख्यमंत्री फडणवीस, उपमुख्यमंत्री पवार, महसूलमंत्री विखे-पाटील, सहकारमंत्री वळसे-पाटील, कृषीमंत्री मुंडे यांनीही महत्त्वाच्या मुद्द्यांची मांडणी केली तसेच चर्चेत सहभाग घेतला.

## कोयना प्रकल्पग्रस्तांचे आमदार रविशेठ पाटील यांना निवेदन



**चौक : प्रतिनिधी**

अखिल कोयना पुनर्वसन सेवा संघाच्या वतीने करण्यात येणाऱ्या आंदोलनाचे निवेदन आमदार रविशेठ पाटील यांच्यासह सर्व शासकीय यंत्रणांना देण्यात आले.

६४ वर्षे कोयना प्रकल्पग्रस्त जनतेचे न्यायिक प्रश्न प्रलंबित आहेत. नागरी सुविधा, पर्यायी जमीन, नोकरी, प्रकल्पग्रस्त दाखले याबाबत समाधानकारक काम न झाल्याने अखिल कोयना पुनर्वसन सेवा संघाच्या वतीने राज्यव्यापी आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला आहे.

या निवेदनाची प्रत पेण येथे आमदार रविशेठ पाटील यांनी निवेदन स्वीकारून राज्य सरकार आपल्या पाठीशी खंबीरपणे उभे राहील. मंत्रालयात आपली पुनर्वसन मंत्र्यांशी चर्चा होणार असून आपले प्रश्न मार्गी लावण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे सांगितले.

## रायगड जिल्ह्यातील १४ तालुक्यांमध्ये गटशिक्षणाधिकाऱ्यांसह केंद्रप्रमुख पद रिक्त

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील १५ तालुक्यांपैकी १४ तालुक्यांमधील गटशिक्षण अधिकारी हे पद रिक्त आहेत. त्यांचा कारभार शिक्षण विस्तार अधिकारी किंवा इतर क्षेत्रातील अधिकाऱ्यांच्या खांद्यावर सोपविण्यात आला आहे. केंद्र प्रमुखपददेखील रिक्त आहेत.



नवीन शैक्षणिक वर्ष नुकतेच सुरू झाले आहे. अशावेळी अनेक महत्त्वाचे निर्णय घ्यायचे असतात. शाळाबाह्य विद्यार्थ्यांची शोधमोहीमही लवकरच सुरू होणार आहे, परंतु तालुकास्तरावर यासंदर्भातील निर्णय घेण्यासाठी किंवा मार्गदर्शन करण्यासाठी वरिष्ठ अधिकारीच नाही. जिल्हा स्तरावर शिक्षण विभागात शिक्षण अधिकाऱ्यांनंतर उपशिक्षण अधिकारी हे पद आहे. त्यानंतर तालुकास्तरावर गटशिक्षण अधिकारी हा जबाबदार अधिकारी असतो, मात्र १५ तालुक्यांपैकी केवळ खालापूर या एका तालुक्यात गटशिक्षण अधिकारी पद भरले गेले आहे. उर्वरित १४ तालुक्यांमधील गटशिक्षण अधिकारी पद रिक्त आहे. सर्व रिक्त पदांचा कार्यभार इतर अधिकाऱ्याकडे देऊन कामकाज केले जात आहे.

गटशिक्षण अधिकाऱ्यांनंतर तालुक्यात केंद्रप्रमुख हे पद महत्त्वपूर्ण आहे. शाळांनी भेटी देणे, शाळांमध्ये सरकारी योजनांच्या अंमलबजावणीवर लक्ष ठेवणे यांसह इतर कामे केंद्रप्रमुख करतात. जिल्ह्यात केंद्रप्रमुखांची २२८ पदे मंजूर असून, यामधील केवळ ४० पदे भरली आहेत उर्वरीत पदे रिक्त आहेत. यात ५० टक्के पदे परीक्षेने आणि ५० टक्के पदोन्नतीने भरावयाची आहेत.

> **शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांच्या रिक्त पदांमुळे मोठी गैरसोय होत आहे. याबाबत शासनाकडे वारंवार विनंती करूनही त्याकडे दुर्लक्ष केले जात आहे. या संदर्भात शासनाचे लक्ष वेधण्यासाठी आता येत्या ४ जुलै रोजी जिल्हा परिषद कार्यालयासमोर शिक्षक परिषदेच्या माध्यमातून शिक्षकांचे धरणे आंदोलन होणार आहे.**
> **-राजेश सुर्वे, राज्याध्यक्ष, राज्य शिक्षक परिषद (प्राथमिक)**

## दरड, भूस्खलनबाधितांना लवकरच प्रकल्पग्रस्तांचा दर्जा

### उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे आढावा बैठकीत निर्देश

**मुंबई : प्रतिनिधी**

पावसाळा आल्यावर राज्यातील अनेक ठिकाणी दरड कोसळण्याच्या घटना घडतात. यात अनेक नागरिक बाधित होतात. त्यांना तात्पुरती मदत केली जाते. यासंदर्भात उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या प्राधिकरणाच्या बैठकीत या वाड्या, वस्त्या, गावांतील बाधितांनासुद्धा प्रकल्पग्रस्तांचा दर्जा देण्याचा निर्णय मंगळवारी (दि.२५) घेण्यात आला. या निर्णयामुळे राज्यातील अनेक पुनर्वसित गावठाणांच्या विकासाचा मार्ग मोकळा झाला असून गेल्या अनेक वर्षांचा प्रलंबित प्रश्न मार्गी लागला आहे.



राज्याच्या विकासासाठी महत्त्वपूर्ण ठरलेल्या विविध प्रकल्पांतील प्रकल्पग्रस्तांसाठी उभारण्यात आलेली पुनर्वसित गावठाणे 'आहे त्या स्थितीत' ग्रामविकास विभागाने तातडीने ताब्यात घ्यावीत. या पुनर्वसित गावठाणांना पुरविण्यात येणाऱ्या १८ नागरी सुविधांसह त्यांच्या विकासासाठी आवश्यक असणारा अतिरिक्त निधी ग्रामविकास विभागाला देण्यात येईल, असा निर्णय राज्य पुनर्वसन प्राधिकरण तथा राज्य पुनर्वसन व पुनर्स्थापना संनियंत्रण समितीचे अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी घेतला.

त्याचबरोबर पुनर्वसित गावठाणात अनेक वर्षांपासून वाटपाविना रिक्त असलेले भूखंड संबंधित प्रकल्पातील बाधितांना द्यावेत, त्यानंतर सदर जिल्ह्यातील प्रकल्पग्रस्तांना द्यावेत, त्यानंतरही शिल्लक राहिले तर राज्यातील इतर प्रकल्पग्रस्तांना या प्राधान्य क्रमानुसार देण्यात यावेत, अथवा कोणी हे भूखंड घ्यायला तयार नसतील तर नियमाप्रमाणे त्यांचे लिलाव करावेत, असा निर्णय या बैठकीत घेण्यात आला.

कोयना धरण प्रकल्पबाधीत गोकुळ, रासाटी, हेळवाकमधील जलविद्युत प्रकल्पामुळे बाधीत शिवनदेश्वर प्रकल्पबाधीत गावांसाठी कोयना भूंकप पुनर्वसन निधीतून विशेष निधी उपलब्ध करून देण्यात यावा. सातारा जिल्ह्यातील तारळी प्रकल्पामध्ये १०० टक्के जमीन गेलेल्या प्रकल्पग्रस्तांच्या उदरनिर्वाह भत्त्यांमध्ये ४०० रुपयांवरून दरमहा एका कुटूंबाला एका वर्षासाठी तीन हजार रुपये वाढ करणे, तसेच याच प्रकल्पातील सावरघर येथील २९ कुटूंबाची खास बाब म्हणून रोख रक्कम देऊन पुनर्वसन करण्याच्या निर्णयाला मान्यता देण्यात आली.

## रामशेठ ठाकूर विद्यालयात अमली पदार्थविरोधी व्याख्यानमाला

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयात मंगळवारी (दि. २५) अमली पदार्थविरोधी जागृतीपर व्याख्यानमालेचे आयोजन आंतरराष्ट्रीय नशा मुक्ती दिवसाचे औचित्य साधून करण्यात आले होते.

यासाठी सीबीडी बेलापूरच्या गुन्हे शाखेच्या अमली पदार्थविरोधी सेलचे सहाय्यक पोलीस निरीक्षक डॉ. विशाल माने, सचिन कोकरे, निवृत्त सहाय्यक पोलीस निरीक्षक सानप सर, पोलीस उपनिरीक्षक कुलदिप मोरे हे उपस्थित होते. त्यांनी अमली पदार्थ सेवनाचे दुपरिणाम याविषयी मार्गदर्शन केले.

प्राचार्य निशा नायर यांच्या मार्गदर्शनाखाली या व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले होते. बहुसंख्य विद्यार्थ्यांनी या व्याखयानमालेचा लाभ घेतला. कार्यक्रमाकरिता संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, अध्यक्ष अरूणशेठ भगत, बोर्ड ऑफ डायरेक्टर संजय भगत, डॉ. सचिव एस. टी. गडदे, स्कूल कमिटी मेंबर प्रभाकर जोशी यांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.



बारशीव जमीन विक्री प्रकरण

## आरोपीचा अटकपूर्व जामीन जिल्हा न्यायालयाने फेटाळला

**रेवदंडा, मुरुड : प्रतिनिधी**

बारशीव येथील एकच जमीन दोघांना विक्री करून आर्थिक फसवणूक करणाऱ्या आरोपीचा अटकपूर्व जामीन जिल्हा न्यायालयाने फेटाळला. त्यामुळे आरोपीने मुंबई उच्च न्यायालय येथे जामीन मिळविण्यासाठी अपील केले आहे.

रेवदंडा पोलीस ठाणे हद्दीतील बारशीव येथील जमीन मिळकत अखत्यारीत यांनी फिर्यादींना विक्री केली व त्याच वेळी जमिनीचे मूळ मालकांनी ही जमीन मिळकत परस्पर दुसऱ्यास व्यक्तीला विक्री करून आर्थिक फसवणूक केल्याप्रकरणी रेवदंडा पोलीस ठाणे येथे ६ मे २०२४ रोजी गुन्हा नोंदविण्यात आला होता. या गुन्ह्यातील आरोपी संतोष रामचंद्र माटे व संदेश रामचंद्र माटे (रा. बारशीव) यांना ३१ मे रोजी अटक करण्यात आली, त्यानंतर हे आरोपी सध्यस्थितीत जामिनावर मुक्त आहेत.

यामधील जगन्नाथ रामचंद्र पुरो, गणेश पंढरीनाथ पुरो तसेच हितेश राजाराम पाटील व इतर आरोपी यांनी जिल्हा सत्र न्यायालय येथे अटकपूर्व जामीन अर्ज दाखल केला, परंतु जिल्हा सत्र न्यायालयाने अटकपूर्व जामीन अर्ज नामंजूर केला. दरम्यान यामधील जगन्नाथ पुरो, गणेश पुरो तसेच हितेश पाटील व इतर आरोपींनी मुंबई उच्च न्यायालय येथे अटकपूर्व जामीन मिळविण्यासाठी अपील केले आहे.

या गुन्हाचा पुढील तपास रेवदंडा सहाय्यक पोलीस निरीक्षक श्रीकांत किरविले करीत आहेत.

## महू येथील भीमजन्मभूमी स्मारकाला केंद्रीय राज्यमंत्री आठवलेंची भेट

**पाली : प्रतिनिधी**

महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या संकल्पनेतील रिपब्लिकन पक्ष साकार करून देशभर पोहचविण्याचे काम मी करीत आहे. देशभरात राष्ट्रीय स्तरावर रिपब्लिकन पक्ष मजबूत आणी राजकीय मान्यताप्राप्त पक्ष करण्याचा आपला निर्धार आहे. प्रमुख राष्ट्रीय पक्ष म्हणून रिपब्लिकन पक्ष साकार करणे हेच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना खरे अभिवादन ठरेल, असे प्रतिपादन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी केले.



केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्रीपदी तिसऱ्यांदा निवड झाल्यानंतर ना.रामदास आठवले सोमवारी (दि.२४) इंदूरला आले असता महू येथील भीमजन्मभूमी स्मारकाला भेट देऊन महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना विनम्र अभिवादन केले. या वेळी केंद्रीय राज्यमंत्रीपद मला मिळाले ते केवळ महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या आशीर्वादामुळेच मिळाले आहे. त्यामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या संकल्पनेतील रिपब्लिकन पक्ष साकार करण्यासाठी आपण सतत प्रयत्नशील राहणार आहोत. महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या संकल्पनेतील रिपब्लिकन पक्ष साकार करण्यासाठी छोट्या छोट्या रिपब्लिकन आंबेडकरी संघटना पक्ष आणि गटांनी रिपब्लिकन पक्षात विलीन व्हावे, असे आवाहन त्यांनी केले.

## उरणमध्ये पाऊस नसल्याने बळीराजा चिंतेत

### शेतातील भाताची रोपे वाढू लागताच वरुणराजाने मारली दडी

**उरण : प्रतिनिधी**

राज्यात यंदा बहुतांशी जिल्ह्यासह रायगड जिल्ह्यात जुनच्या प्रारंभी दुसऱ्या आठवड्यात पावसाला मोठ्या प्रमाणात सुरुवात झाली, मात्र उरण तालुक्यात अधून-मधून हलक्या सरींचा पाऊस झाला. भातशेतीच्या पेरण्याही झाल्या. मागील दोन आठवड्यापासून तालुक्यात योग्यतेने पाऊस होत नसल्याने बळीराजाच्या तोंडचे पाणी पळाले आहे. पेरणीनंतर मध्यंतरी झालेल्या पावसाने शेतातील भाताची रोपे वाढू लागली आहेत, मात्र पाऊस पुन्हा गायब झाल्यामुळे बळीराजा चिंतेत आहे.

तालुक्यातील ठिकठिकाणच्या शेतात पेरणी करण्यात आलेली भाताची रोपे वाढू लागली आहेत. त्यामुळे तालुक्यातील बळीराजा शेतीच्या मशागतीत मग्न असल्याचे सर्वत्र पाहावयास मिळत आहे. यंदा पावसाने काहीसा विलंब केल्याने भाताच्या लागवडीच्या प्रारंभासाठी किमान आठवड्याचा अवधी लागणार आहे. वरुणराजाने योग्यतेने पावसाची बरसात केल्यास यंदा भाताची लागवड लवकरच होईल, अशी आशा येथील शेतकरी व्यक्त करीत आहेत.



## पेण गडब येथे फळरोप लागवड



**पेण : प्रतिनिधी**

बजाज इलेक्ट्रिकल लि. च्या कार्यालयीन कर्मचाऱ्यांनी सहयोग मानव जनजागृती संस्था व अक्षय प्रतिष्ठान यांच्या माध्यमातून गडब डोंगराळ भागात १००० फळवृक्ष लागवड केले.

डॉ. सोनाली वनगे, गडब ग्रामपंचायतीचे उपसरपंच दिनेश म्हात्रे यांच्या प्रयत्नाने बजाज इलेक्ट्रिकल लिमिटेडसोबत संपर्क झाल्यानंतर वृक्षवाढीकरीता योग्य जागेची राजकुमार दिवाकर यांनी पाहणी केली. कंपनीचे सीएसआर चॅम्पियन गुणवंत कुलकर्णी यांनी निसर्गाच्या सान्निध्यामध्ये कार्यालयीन कर्मचाऱ्यांना अधिकाऱ्यांसह मुंबईहून गडब येथे झाडांचे रोपण करून अनेक कुटुंबाना आधार दिला.

या कार्यक्रमासाठी कंपनीकडून सीएफओ इ. सी. प्रसाद, सीएसआर चॅम्पियन गुणवंत कुलकर्णी, कमर्शियल हेड मुकुंद उमाडीकर, श्रीनिवास गोखले, ट्रेजरी हेड परितोष चौगुले व ४० कर्मचाऱ्यांनी सहभाग घेतला. समाज संस्थेचे अध्यक्ष संदीप म्हात्रे, उपाध्यक्ष प्रशांत पाटील, घनश्याम पाटील, कैलास पाटील, तेजस पाटील, यश म्हात्रे, हर्षल केणी, निलेश पाटील अक्षय प्रतिष्ठानचे परशुराम पाटील, तुकाराम पाटील, सिद्धेश पाटील, दीप पाटील आदींनी परिश्रम घेतले.

## सत्याग्रह महाविद्यालयात आज विविध कार्यक्रम

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

सत्याग्रह महाविद्यालयाच्या वतीने राजर्षी छत्रपती शाहु महाराज यांचा १५०व्या जयंती दिन तथा सामाजिक न्याय दिनाचे आयोजन प्रा. डॉ. जी. के. डोंगरगावकर यांच्या अध्यक्षतेखाली बुधवारी (दि.२६) आयोजित करण्यात आले आहे.

सत्याग्रह अध्यापक महाविद्यालय, सत्याग्रह महाविद्यालय, सत्याग्रह ज्युनिअर कॉलेज, सिद्धार्थ स्कूल, अजिंठा इंटरनॅशनल स्कूल, डॉ. जी. के. डोंगरगावकर इंटरनॅशनल स्कूल, डॉ. नेल्सन मंडेला निवासी आश्रमशाळेमध्ये निबंध स्पर्धा, वक्तृत्व व वादविवाद स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे, तसेच इ.१० वी व १२ वी मध्ये ९० टक्केपेक्षा जास्त गुण प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांचा गुणगौरव आणि संस्थेच्या ज्युनिअर कॉलेज आणि डिग्री कॉलेजमध्ये या विद्यार्थ्यांला निशुल्क प्रवेश देण्याचे संस्थेने जाहीर केले आहे. छत्रपती शाहु महाराज आणि त्यांच्या विचाराची प्रासंगिकता यावर प्रा. संगिता जोगदंड यांचे व्याख्यान आहे तसेच सहाय्यक आयुक्त समाजकल्याण विभागाच्या वतीने सामाजिक न्याय दिन व आंतरराष्ट्रीय मादक द्रव्य पदार्थ सेवनविरोधी दिनाचे आयोजन करण्यात आले आहे.

## निवडक

### उरण येथे बर्निंग ट्रकचा थरार

**उरण :** येथे भर बाजारपेठेत ट्रकला आग लागली. राजपाल नाका जात असताना ट्रकच्या मागील बाजूस आग लागली. लोकांनी चालकाला गाडी थांबिण्यास सांगितले, मात्र घटनेची गांभीर्य लक्षात घेत ट्रकचालकाने ट्रक बाजारपेठेतून काढून पेन्शर्नर पार्क येथे थांबवला. सिडकोचे दोन अग्निशमक बंब येऊन तत्काळ विझवण्यात आली. सुदैवाने जीवितहानी झाली नाही. ट्रकमध्ये बॅटरीज असल्याने आग लागली असल्याचा प्राथमिक अंदाज आहे.



### कोळखे येथे तरुणीची आत्महत्या

**पनवेल :** राहत्या घरात अज्ञात कारणावरून एका तरुणाने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना तालुक्यातील कोळखे गाव येथे घडली आहे. या ठिकाणी राहणाऱ्या एका २७ वर्षीय तरुणीने राहत्या घरात अज्ञात कारणावरून गळफास घेऊन आत्महत्या केली आहे. याबाबतची नोंद शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

# पनवेलमध्ये प्लास्टिकविरोधी कारवाई

## ३७ किलो पिशव्यांचा साठा जप्त ■ २१ हजारांचा दंड वसूल

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आयुक्त मंगेश चितळे यांच्या निर्देशानूसार पनवेल महापालिकेच्या खारघर, कळंबोली, कामोठे या तीन प्रभागांमध्ये मंगळवारी (दि. २५) प्लास्टिकविरोधी कारवाई करण्यात आली. यामध्ये सुमारे ३७ किलो सिंगल युज प्लास्टिक पिशव्यांचा साठा जप्त करण्यात आला तसेच सुमारे २१ हजाराचा दंड वसूल करण्यात आला.



पनवेल महापालिका क्षेत्रात आज मोठी प्लास्टिकविरोधी कारवाई करण्यात आली. यामध्ये प्रभाग समिती 'अ' खारघर प्रभागामध्ये रेल्वे स्टेशन येथे परिसरात प्लास्टिक पिशवी (सिंगल युझ प्लास्टिक) बंदी कारवाईदरम्यान पाच हजार रुपयांचा दंड आकारण्यात आला. या कारवाईमध्ये सुमारे पाच किलो प्लास्टिक जप्त करण्यात आले.

प्रभाग समिती 'ब' कळंबोली प्रभागामध्ये आज प्रभाग क्रमांक ९ आणि प्रभाग क्रमांक १० कळंबोली येथील भाजी मार्केट, फळ विक्रेते व हॉटेल व्यवसायिक यांच्यावरती प्लास्टिक पिशवी बंदी (सिंगल युझ) कारवाई करण्यात आली. या कारवाईमध्ये अंदाजे १० किलो प्लास्टिक जप्त करण्यात आले व ११ हजार रुपये दंड वसूल करण्यात आला.

प्रभाग समिती 'क' अंतर्गत कामोठा -कळंबोली विभागाच्या माध्यमातून खांदा कॉलनी वार्ड १४ व १५ येथील भाजी मार्केट व फळ विक्रेते व हॉटेल यांच्यावरती प्लास्टिक पिशवी (सिंगल युझ) बंदी कारवाई करण्यात आली. या कारवाईमध्ये अंदाजे २२ किलो प्लास्टिक जप्त करण्यात आले व पाच हजार दंड वसूल करण्यात आला. या ठिकाणी मुख्य आरोग्य निरीक्षक शैलेश गायकवाड व स्वच्छता निरीक्षक, पर्यवेक्षक व स्वच्छता दूत उपस्थित होते.

पनवेल महापालिका क्षेत्रात एकल वापर (सिंगल युज) प्लास्टिकवरती प्रतिबंध करण्यात आला आहे. उपायुक्त डॉ. वैभव विधाते यांच्या यांच्या सूचनेनुसार प्रतिबंधित प्लास्टिकची साठवणूक, विक्री आणि वापर करणाऱ्यांवर महापालिकेच्या वतीने कठोर कारवाई करण्यात येत आहे.

**दंड, शिक्षेची तरतूद**

प्लास्टिकविरोधी कारवाईमध्ये पहिला गुन्हा नोंद झाल्यावर पाच हजार रुपये, दुसरा गुन्हा नोंद झाल्यावर १० हजार रुपये, तिसरा गुन्हा नोंद झाल्यावर २५ हजार रुपये दंड आणि तीन महिन्यांचा कारावास असणार आहे.

# बनावट कॉल सेंटर उद्ध्वस्त

## सूत्रधार पनवेल पोलिसांच्या ताब्यात

**पनवेल : वार्ताहर**

ईएमसी सायबर सेल पनवेल यांच्याकडून इंदोर येथील आणखी एक बनावट कॉल सेंटर उद्ध्वस्त करण्यात आले आहे.

कामोठे पोलीस ठाण्याच्या हद्दीमध्ये तंत्रज्ञान अधिनियमन ६६ (सी), ६६ (डी)प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेल्या गुन्ह्याच्या तपासामध्ये सायबर सेल पनवेल यांनी इंदोर येथील तुकोगंजमधील अपोलो टॉवर्समध्ये ऑनलाईन शेअर मार्केटच्या फसवणुकीकरिता चालविले जाणारे एक फ्रॉड कॉल सेंटर उद्ध्वस्त केले आहे.

या गुन्ह्याचा सखोल व तांत्रिक तपासामध्ये गुन्ह्याच्या टोळीचा मुख्य सुत्रधार हा देवास, मध्य प्रदेश येथे असल्याचे या पथकाला समजून आले. त्यानुसार या पथकाने त्या ठिकाणी जावून मुख्य सूत्रधार यश उंबरकर याला शिताफीने ताब्यात घेतले. त्याच्याकडे अधिक तपास केला असता त्याने फ्रॉड कॉल सेंटर चालवित असल्याची कबुली दिली.



त्यानुसार सदर ठिकाणी या पथकाने छापा टाकून १० डेस्कटॉप, १० सीपीयू व दोन राऊटर हस्तगत केले आहेत. अधिक तपास सुरू आहे.

टेलिग्राम, व्हॉटसअप, इंस्टाग्राम, फेसबुक या समाजमाध्यमांवरुन ओळख करून जर कोणी शेअर मार्केट गुंतवणक व इतर ऑनलाईन कामाचे प्लॅन सांगून वेगवेगळ्या अकाऊंटमध्ये ऑनलाईन पैसे ट्रान्सफर करण्यास सांगत असेल तर त्याबाबत सतर्क रहावे. ऑनलाईन फसवणुकीची तक्रार टोल फ्री क्र.१९३० किंवा cybercrime.gov.in येथे त्वरित करावी, असे पोलीस उपायुक्त विवेक पानसरे यांनी सांगितले आहे.

# लाखोंची फसवणूक करणाऱ्या व्यवस्थापकावर गुन्हा दाखल

## बनावट, कमी प्रतीचे सोने तारण ठेवून अपहार

**पनवेल : वार्ताहर**

केएलएम ऍक्सीव्ह फिनवेस्ट लि. या फायनान्स कंपनीच्या पनवेल शाखेत कार्यरत असलेल्या व्यवस्थापकाने ग्राहकांसोबत संगनमत करून बनावट तसेच कमी प्रतीचे (कॅरेटचे) सोने तारण ठेवून तब्बल २१ लाख ८८ हजार रुपयांचा अपहार केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. महेश महादेव कदम असे या व्यवस्थापकाचे नाव असून पनवेल शहर पोलिसांनी त्याच्या विरोधात फसवणुकीसह अपहाराचा गुन्हा दाखल करून त्याचा शोध सुरू केला आहे.

केएलएम ऍक्सीव्ह फिनवेस्ट लि. ही फायनान्स कंपनी केरळ राज्यातील असून या कंपनीची शाखा पनवेलमध्ये आहे. या शाखेमध्ये व्यवस्थापक म्हणून महेश कदम यांची नेमणूक करण्यात आली होती. कदम यांनी या पदाचा कार्यभार हाती घेतल्यानंतर फायनान्स कंपनीकडे येणाऱ्या ग्राहकांसोबत संगनमत करून अफरातफर करण्यास सुरुवात केली, मात्र या फायनान्स कंपनीकडून प्रत्येक महिन्याला ऑडिट करण्यात येत असल्याने मार्च २०२३ मध्ये पनवेल शाखेच्या व्यवहारामध्ये घोटाळा दिसून आला. तपासाअंती व्यवस्थापक महेश कदम याने बनावट व कमी प्रतीचे सोने तारण ठेवून तब्बल ३२ लाख ३५ हजार रुपयांचा अपहार केल्याचे आढळून आले. यानंतर कंपनीच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी महेश कदम याच्याकडे याबाबत चौकशी केली असता त्याने आपली चूक कबूल केली तसेच ग्राहकांकडून पैसे वसूल करून देण्याचे आश्वासन कंपनीला दिले होते. त्यानंतर महेश कदम याने काही ग्राहकांकडून दहा लाख ४६ हजारांची रक्कम वसूल करून कंपनीला दिली, मात्र त्यानंतर कदम याने उर्वरित २१ लाखांची रक्कम कंपनीला परत दिलेली नाही.

# पावसाळा लांबल्याने पनवेलमधील ४० गाव-वाड्यांत टँकरने पाणीपुरवठा

**पनवेल : वार्ताहर**

जून महिना संपायला आला तरीदेखील पनवेल तालुक्यात हवा तसा मुसळधार पाऊस पडलेला नाही. त्यामुळे पनवेल तालुक्यात १३ टँकरने जवळपास चाळीस गाव-वाड्यामध्ये टँकरने पाणीपुरवठा सुरू आहे.

पावसाळा सुरू झाला आहे, मात्र मुसळधार पाऊस पडत नसल्याने अद्यापही पाणीटंचाई कमी झालेली नाही. १४ जूनपर्यंत पनवेल तालुक्यात ५० ठिकाणी गाव-वाड्यांमध्ये पंधरा टँकरमार्फत पाणीपुरवठा सुरू होता. त्यानंतर कोरल आणि घेरावाडी येथील एक टँकरचा पाणीपुरवठा बंद करण्यात आला. त्यामुळे १४ टँकरने पाणीपुरवठा सुरू होता. या आठवड्यात वाजे येथील ११ ठिकाणचा एका टँकरने होणारा पाणीपुरवठा बंद करण्यात आला आहे. त्यामुळे सद्यस्थितीत तालुक्यात १३ ठिकाणी टँकरने पाणीपुरवठा सुरू आहे. गत आठवड्यापासून तेरा गाव-वाड्यातील टँकरने पाणीपुरवठा बंद करण्यात आला आहे. त्यामुळे ३७ ठिकाणी टँकरने पाणीपुरवठा सुरू आहे.

यात शिरढोण, आपटा, कसळखंड, वांगणी तर्फे वाजे, मालडुंगे, पाले बुद्रुक, खैरवाडी, वारदोली, वडघर, बारवई, नांदगाव, नानोशी, वांगणी तर्फे वाजे या ग्रामपंचायत मधील गाव-वाड्यांचा समावेश आहे. मुसळधार पाऊस पडल्यानंतर तालुक्यातील टँकरने पाणीपुरवठा बंद होऊ शकतो. हवामान खात्यामार्फत मुसळधार पावसाची शक्यता वर्तवण्यात येत आहे, मात्र जून महिन्यातील २५ तारीख उजाडली तरी देखील सलग तीन ते चार दिवस पाऊस बरसला नाही. त्यामुळे नद्या, नाल्या तुडुंब भरून वाहत नाहीत.

काही ठिकाणी एप्रिल-मे महिन्यातच बोअरवेलचे पाणी कमी झाले आहे. त्यामुळे मुसळधार पाऊस झाला तरच बोअरवेल आणि विहिरींना पाणी येईल आणि टँकरने होणारा पाणीपुरवठा बंद होईल.



**पनवेल : गव्हाण येथील भाजपचे ज्येष्ठ कार्यकर्ते कै. रतन कोळी यांच्या पत्नी व संजीव कोळी यांच्या आई वत्सलाबाई कोळी यांचे नुकतेच निधन झाले आहे. त्याबद्दल माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी कोळी कुटुंबीयांच्या घरी जाऊन त्यांचे सांत्वन केले. या वेळी भाजपचे ज्येष्ठ नेते वाय.टी. देशमुख, माजी पं.स. सदस्य भाऊशेठ पाटील, कोळी समाजाचे जिल्हाध्यक्ष विश्वनाथ कोळी, हेमंत ठाकूर, जयवंत देशमुख, प्रमोद कोळी आणि कोळी कुटुंबीय उपस्थित होते.**



**पनवेल : माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांना मुंबई मराठी पत्रकार संघाने विशेष सन्माननीय सदस्यत्व प्रदान केल्याबद्दल ज्येष्ठ पत्रकार गणेश कोळी व पत्रकार विजय पाटील यांनी अभिनंदन केले.**

### चोरीस गेलेली गाडी हस्तगत

**पनवेल :** शहर परिसरातून चोरीस गेलेली महिंद्रा कंपनीची एक्सयुव्ही ५०० गाडी पनवेल शहर पोलिसांनी हस्तगत केली आहे. पनवेल परिसरातून १० लाख रुपये किंमतीची सफेद रंगाची महिंद्रा कंपनीची एक्सयुव्ही ५०० मॉडेल गाडी (एमएच ४०-बीजे २३५४) ही चोरीस गेली होती. या संदर्भात पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल होताच पोलिसांच्या पथकाने तांत्रिक व गुप्त बातमीदाराद्वारे शोध घेतला असता गाडीची माहिती मिळून आल्याने ही गाडी ताब्यात घेण्यात आली आहे. याबाबत पुढील तपास सुरू आहे.

### गाडीचे टायर चोरले

**पनवेल :** अपोलो कंपनीचे मारुती ग्रॅण्ड व्हिटारा गाडीचे ४ टायर अज्ञात चोरट्यांनी रिंगसह चोरून नेल्याची घटना तालुक्यातील ओवळे येथे घडली आहे. ओवळे येथे राहणारे प्रल्हाद गायकवाड यांच्या मालकीची ग्रॅण्ड व्हिटारा गाडीचे चार टायर (किंमत जवळपास ३२ हजार रुपये) अज्ञात चोरट्याने चोरून नेले. याबाबतची तक्रार शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

# रामशेठ ठाकूर महाविद्यालयात विद्यार्थ्यांसाठी ओरिएंटेशन प्रोग्राम

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व शास्त्र महाविद्यालयात मंगळवारी (दि.२५) शास्त्र, माहिती व तंत्रज्ञान व कम्प्युटर सायन्स यांच्या संयुक्त विद्यमाने द्वितीय व तृतीय वर्षाच्या विद्यार्थी व विद्यार्थिनींसाठी ओरिएंटेशनचे आयोजन केले होते.



या ओरिएंटेशनसाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रूपेंद्र गायकवाड यांनी उपस्थित राहून महाविद्यालयातील तिन्ही शाखेतील द्वितीय व तृतीय वर्षाच्या विद्यार्थी व विद्यार्थिनींना महाविद्यालयात घेतले जाणारे सामाजिक व पर्यावरणीय उपक्रम तसेच विविध कोर्सेस, अभ्यासक्रम, प्लेसमेंट ड्राईव्ह, वेगवेगळ्या नामांकित संस्थांबरोबर असणारे सामंजस्य करार व त्यातून होणारे माहितीचे आदान-प्रदान याविषयी मोलाचे मार्गदर्शन केले व शुभेच्छा दिल्या.

या ओरिएंटेशन प्रोग्रामचे आयोजन प्रा. डॉ. महेश्वरी झिरपे शास्त्र विभाग प्रमुख, प्रा. राजश्री म्हात्रे माहिती व तंत्रज्ञान विभाग प्रमुख, प्रा. रिजवाना मोमीन कम्प्युटर सायन्स विभाग प्रमुख यांनी केले तसेच तिन्हीही विभागातील सर्व प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी उपस्थित राहून सहकार्य केले.

# चिरनेर महागणपतीच्या दर्शनाचा हजारो भाविकांनी घेतला लाभ

## अंगारक संकष्ट चतुर्थीचे औचित्य

**उरण : वार्ताहर, प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील उरण तालुक्यातील चिरनेर शब्द उच्चारला की, श्री महागणपती व चिरनेर जंगल सत्याग्रह ही दोन नावे पुढे येतात. याच उरण तालुक्यातील चिरनेर महागणपती क्षेत्रात अंगारक संकष्ट चतुर्थीनिमित्ताने मंगळवारी हजारो भाविकांनी प्राचीन जागृत श्री महागणपतीच्या दर्शनाचा लाभ घेतला.



या निमित्ताने गणेश मंदिरात दिवसभर अनेक भजनी मंडळांकडून भजनांचा कार्यक्रम सादर करण्यात आला. श्री महागणपतीचे देवस्थान अत्यंत पुरातन व जागृत असून, येथील श्रींच्या दर्शनासाठी मुंबई, नवी मुंबई, पुणे, ठाणे, डोंबिवली, कल्याण, उरण, पनवेल, पेण तसेच राज्याच्या अनेक भागातून, आलेल्या हजारो भाविकांनी पहाटेपासूनच गर्दी केली होती. त्यामुळे संपूर्ण चिरनेर गाव भाविक भक्तांनी फुलून निघाले होते. भक्तगणांची गैरसोय होऊ नये, सर्वांना सुखकर सोयी सुविधा मिळून, रांगेत दर्शन घेता यावे, यासाठी चिरनेर गणपती देवस्थान प्रशासनाकडून आवश्यक सुसज्ज नियोजन करण्यात आले होते. चिरनेरच्या पावन तीर्थात भक्तीमय वातावरण निर्माण झाले होते.

**गणेशभक्त हे न चुकता दर संकष्टीला आणि माघी गणेशोत्सवानिमित्त श्री महागणपती दर्शनासाठी येत असतात. त्यामुळे दिवसेंदिवस गणेशभक्तांच्या गर्दीचा उच्चांक वाढत आहे.**

**-संतोष ठाकूर, माजी विश्वस्त, चिरनेर गणपती देवस्थान ट्रस्ट**

# पनवेल चर्मकार समाज प्रतिष्ठानची समिती स्थापन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

चर्मकार समाज प्रतिष्ठान रायगड पनवेल तालुका शाखेची वार्षिक सर्वसाधारण सभा आदित्य महादेव सहकारी गृहनिर्माण संस्थेमध्ये विजय मोहोकर यांच्या अध्यक्षतेखाली रविवारी (दि. २३) झाली. या सभेत चर्मकार समाज प्रतिष्ठानच्या पनवेल तालुक्याची समिती नेमण्यात आली.



यामध्ये अध्यक्षपदी विजय मोहोकर, सरचिटणीसपदी बाळकृष्ण गरुड, चिटणीसपदी प्रवीण मोहोकर आणि खजिनदारपदी सचिन उरणकर, उपाध्यपदी रामनाथ आंबोळकर, दिनकर गव्हाणकर, लक्ष्मण कल्याणकर, गणेश आंबोलकर, तुकाराम म्हात्रे, शशिकांत मोहोकर, सल्लागारपदी माजी नगरसेवक यशवंत सावळेकर, ॲड. जगदीश उरणकर, महिला प्रतिनिधी म्हणून रेणुका मोहोकर, सुलोचना कल्याणकर आणि सुरेखा मोहोकर यांची निवड करण्यात आली तसेच जिल्हा पातळीवर अरविंद सावळेकर आणि डॉ. विलास मोहोकर यांची सभासद म्हणून निवड झाली.

या वेळी सभागृह मधील सर्व सभासदांनी या कार्यकारणीला मजुरी देऊन सर्व नवनिर्वाचित पनवेल तालुका कार्यकारणीचे स्वागत करून अभिनंदन करण्यात आले. अध्यक्ष पद स्वीकारल्यानंतर विजय मोहोकर यांनी सर्व सभासदांचे आभार मानले तसेच श्री संत रोहिदास जयंती, डॉ. बाबासाहेब जयंती, छत्रपती शिवाजी महाराज जयंती, विध्यार्थी गुण गौरव, व इतर सांस्कृतिक कार्यक्रम ठराव नुसार करण्याचे आश्वासन दिले.

या सभेत रोहिदास वाड्यातील समाज मंदिराला श्री संत रोहीदास महाराज यांचे नाव देण्याचे सर्वानुमते ठरवून महापालिकेडे याबाबत पाढपुरावा करणार असल्याचे ठरवण्यात आले. या सभेला रायगड जिल्हा चर्मकार समाज प्रतिष्ठानचे अध्यक्ष नंदू तळकर, माजी अध्यक्ष तथा माजी नगरसेवक अरविंद सावळेकर, माजी नगराध्यक्ष ॲड. जगदीश उरणकर, डॉ. विलास मोहोकर, माजी नगरसेविका रेणुका मोहोकर, पनवेल न्याती चर्मकार समाजाचे माजी अध्यक्ष लक्ष्मण कल्याणकर, रामनाथ आंबोलकर, दिनकर गव्हाणकर, गणेश आंबोलकर, भगवान कल्याणकर, रघुनाथ उरणकर, अतीश मोहोकर, सुनील मोहोकर, किशोर मोहोकर यांच्यासह समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होत.

## संपादकीय

# नखरे आणि विरोधक!

अठराव्या लोकसभेचे पहिले अधिवेशन सुरू झाले असून अधिवेशनात लोकांच्या आशा-आकाक्षांचे प्रतिबिंब पडले पाहिजे ही अपेक्षा वावगी नाही. नुकत्याच पार पडलेल्या निवडणुकीतील जनादेशाचा अर्थ काय याचे कवित्व बराच काळ चालले. या निवडणुकीत भाजपचे संख्याबळ घटले, याचा अर्थ भारतीय मतदारांना हे सरकार नकोच आहे, असा जावईशोध लावण्यात विरोधक धन्यता मानत आहेत. जनादेशाचा योग्य अर्थ लावणे व त्याचा आदर करणे त्यांना अवघड जात असल्याचेच हे लक्षण. पण आता असल्या चर्चेतून बाहेर पडून पुढे पाहा, असे सांगण्याची वेळ आली आहे.

**अधिवेशनाच्या मुहूर्तावर प्रसारमाध्यमांशी बोलताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सर्वांना बरोबर घेऊन जाण्याचा मनोदय व्यक्त केला. सलग तिसऱ्यांदा एखाद्या पक्ष-आघाडीला सत्ता मिळणे ही खूपच मोठी गोष्ट आहे, याचाही त्यांनी उल्लेख केला. लोकांच्या कल्याणासाठी आणि २०४७ पर्यंत भारत विकसित देशांच्या पंक्तीत बसला पाहिजे, या स्वप्नाच्या पूर्तीसाठी आम्ही आणखी मेहनत करू, अशी ग्वाही त्यांनी दिली. नव्या भारताला विरोधकांकडूनही भरीव कामाची अपेक्षा आहे. नुसतीच नौटंकी आणि नखरे काही कामाचे नाहीत. असल्या माध्यमांपुढल्या नाटकांनी काहीही साध्य होणार नाही, याचे स्मरण विरोधी इंडिया आघाडीला कुणीतरी करून देण्याची गरज होतीच. पंतप्रधानांनी ती करुन दिली हे योग्यच झाले. संविधानाच्या प्रती घेऊन विरोधी सदस्य घोषणा देतच संसदेत आले. संविधानाचा सर्वात जास्त अपमान आणि अवहेलना केली असेल तर ती कॉँग्रेसनेच. २५ जून ही तारीख भारतीय जनता कधीही विसरणार नाही, कारण याच तारखेला घटनेची पायमल्ली करून कॉँग्रेस सरकारने आणीबाणी लागू केली होती. विरोधकांना तुरुंगात टाकले होते. दडपशाहीचे ते काळेकुट्ट सत्र होते. तोच कॉँग्रेस पक्ष आता हातात संविधानाची प्रत फडकवताना दिसतो, हा करुण विनोदच मानायला हवा. भारतीय जनता पक्षाला किंबहुना संपूर्ण राष्ट्रीय लोकशाही आघाडीला संविधानाचा अर्थ शिकवण्याच्या भानगडीत निदान कॉँग्रेसने तरी पडू नये. इंडिया आघाडीच्या नेत्यांना टीव्ही कॅमेऱ्यांसमोर दांभिकपणा करण्याची सवयच जडली आहे. यामुळे अंतिमत: जनतेचेच नुकसान होते, याची त्यांना पर्वा नसली तरी केंद्र सरकारला आहे. 'सरकार चालवण्यासाठी बहुमत लागते; पण देश चालविण्यासाठी व्यापक जनसहमती आवश्यक असते', असा परिपक्व विचार पंतप्रधान मोदींनी मांडला तो त्यासाठीच. निवडणुकीत लोकांनी सत्ता पुन्हा सुपूर्द केली, याचा अर्थ मोदी सरकारच्या धोरणांवर जनतेची पसंतीची मोहर उमटली आहे, हे तर उघडच दिसते. या वेळी मोदी सरकारचे संख्याबळ किंचित कमी झालेले दिसले, तरी त्याला काही राजकीय कारणे आहेत. जनतेचा कौल नि:संशय मोदी यांच्याच बाजूने लागला आहे. विरोधकांना हे वास्तव पचवावे लागेल असे मोदी म्हणाले. या निवडणुकीने मजबूत विरोधी पक्षही दिला आहे. त्यांचा आवाज संसदेच्या सभागृहात उमटावा. त्यासाठी सर्व संसदीय आयुधे अवश्य वापरली जावीत. सत्ताधाऱ्यांवर प्रभावी असा अंकुश विरोधकांनी ठेवावा, अशी अपेक्षा आहे. गोंधळ आणि बहिष्काराच्या माध्यमातून विरोध केवळ 'दृश्यमान' राहावा, याच्या खटपटीत इंडिया आघाडीने अडकू नये. या अधिवेशनात जर अशा प्रकारचे बदल दिसले तर नवे वातावरण निर्माण होत असल्याचा विश्वास लोकांना वाटेल. संसदेच्या नव्या वास्तूत होत असलेल्या अधिवेशनाकडून सर्वसामान्य लोकांची तीच अपेक्षा आहे.**

# सावध व्हा! अमली पदार्थांचे विष मुलांपर्यंत पोहचले

**(२६ जून : जागतिक अमली पदार्थविरोधी दिन विशेष)**

आजच्या आधुनिक युगात आपण म्हणायला तर प्रगती करत आहोत, पण मूल्य, जबाबदारी, आदर, आपुलकी, प्रेम, करुणा, दया, नैतिकता या शब्दांना काही किंमत राहिलेली दिसत नाही. समाजात सतत अराजकता पसरत असल्याने सामाजिक समस्या आणि गुन्हे झपाट्याने वाढले आहेत. यामागील एक प्रमुख कारण म्हणजे अमली पदार्थांचे व्यसन. एक काळ असा होता जेव्हा आपण चरस, गांजा, कोकेन यांसारख्या धोकादायक ड्रग्जबद्दल फक्त ऐकायचो आणि चित्रपटांमध्ये बघायचो, पण आता हे विष आपल्याच लोकांपर्यंत पोहचले आहे आणि शालेय-महाविद्यालयात जाणारे युवक या व्यसनाच्या आहारी जाऊन आपले आयुष्य उद्ध्वस्त करत आहेत. अमली पदार्थांच्या तस्करीच्या बातम्या आपण रोजच वाचतो-ऐकतो, तरुणाई मोठ्या प्रमाणात ड्रग्जकडे आकर्षित होत आहे. हुक्का बार, पब आणि पार्ट्यांचा कल वाढत आहे, या समस्येत पालकांची सर्वात मोठी चूक दिसते. जे आजच्या तरुण पिढीला योग्य संस्कार आणि उत्तम संगोपन देण्यात अपयशी ठरत आहे. अनेकदा रस्त्याच्या कडेला, पदपथावर, निर्जन ठिकाणी, नाल्या किनारी किंवा काही झोपडपट्ट्यांमध्ये लहान मुलांपासून मोठ्यांपर्यंत नशा करताना दिसतात. सॅनिटायझर, व्हाईटनर, खोकल्याचे सिरप, वेदना कमी करणारे स्प्रे, गोंद, पेंट, पेट्रोल सारख्या अल्कोहोलयुक्त ज्वलनशील घातक रसायनांचा उग्र वास घेऊन लहान मुलेही नशा करतात. अनेक वेळा पालक मुलांच्या अशा कृतींकडे दुर्लक्ष करतात, जे घातक असते. देशातील १०-१७ वर्षे वयोगटातील सुमारे १५.८ दशलक्ष मुले ड्रग्जच्या आहारी गेली आहेत. जागतिक अंमली पदार्थांच्या तस्करीचा व्यापार ६५० अब्ज अमेरिकी डॉलर इतका आहे, जो एकूण अवैध अर्थव्यवस्थेच्या ३० टक्के आहे. जगभरात दरवर्षी २.३ दशलक्ष मृत्यूंना केवळ मद्य



कारणीभूत आहे.

लहानपणापासून महागडे छंद, हट्टीपणा, गर्लफ्रेंड-बॉयफ्रेंड च्या नात्याचा ट्रेंड, ताणतणाव, आधुनिकतेचा जगमघाट, खोटे देखावे आणि चित्रपट, सोशल मीडियाचा मुलांच्या मनावर वाईट परिणाम याने किशोरवयीन मुलांचे अंमली पदार्थांबद्दलचे आकर्षण वाढवून त्यांचे जीवन विषारी केले आहे. काही दिवसांपूर्वी पुणे शहरात एका लक्षाधीश बांधकाम व्यावसायिकाच्या अल्पवयीन अमली पदार्थाच्या आहारी गेलेल्या मुलाने दोन अभियांत्रिकी तरुणांना त्याच्या पोर्श कारने चिरडले, तरीही या प्रभावशाली बांधकाम व्यावसायिक पित्याने आपल्या गुन्हेगार मुलाला वाचवण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले. चार महिन्यांपूर्वी नागपुरात एका मोठ्या उद्योगपती उच्चभ्रू कुटुंबातील सुनेने मध्यरात्री दारूच्या नशेत दोन तरुण अभियंत्यांची गाडीने चिरडून मारले. आता पुन्हा नागपुरात रात्री अभियांत्रिकी विद्यार्थ्यांने नशेच्या मद्यधुंदीत कार चालवतांना पदपथावर झोपलेल्या नऊ लोकांना चिरडले. आजकाल पालकांना त्यांच्या जबाबदाऱ्या समजत नाही आहेत, रोज अमली पदार्थांशी संबंधित गुन्ह्यांच्या बातम्या वाचायला आणि ऐकायला मिळतात. अमली पदार्थांच्या व्यसनामुळे काही तरुण आपल्या आई-वडिलांचीदेखील हत्या करतात, तर काही मुले नशेत असताना गुन्हे करत आहेत. पालक सतत व्यस्त असणे, मुलांच्या दैनंदिन दिनचर्येकडे लक्ष न देणे, मुलांवर ताबा नसणे, मुलांच्या चुकांकडे नेहमी दुर्लक्ष करणे, केवळ महागडी साधनं किंवा भौतिक सुविधा पुरवणं, मुलांचे अवाजवी लाड करून त्यांची प्रत्येक इच्छा पूर्ण करणं ही पालकांनी आपली जबाबदारी मानली आहे. पण मुलांना वेळ देणे, त्यांच्या चांगल्या वाईट गोष्टी समजून योग्य वळण देणे, मुलांच्या उपक्रमात सहभागी होणे, मुलांचे मित्र म्हणून जगणे ही पालकांची महत्त्वाची जबाबदारी आहे.

मादक पदार्थांच्या गैरवापराबद्दल जागरूकता निर्माण करण्यासाठी आणि अंमली पदार्थांची तस्करी रोखण्यासाठी दरवर्षी २६ जून रोजी अंमली पदार्थांचा गैरवापर आणि अवैध तस्करी विरुद्ध आंतरराष्ट्रीय दिवस जगभरात साजरा केला जातो. या वर्षीची थीम पुरावा स्पष्ट आहे : प्रतिबंधात गुंतवणूक करा ही आहे. आज भारत हा जगातील सर्वांत मोठा तरुणांचा देश आहे, तरुणांची काळजी घेऊन त्यांची योग्य दिशेने वाटचाल हाच देशाचा विकास आहे. अमली पदार्थांच्या तस्करीसाठी किशोरवयीन मुलांचा वापर केला जातो, त्यांना पैशाचे आमिष दाखवून असे चुकीचे काम केले जाते, त्यामुळे शाळा-कॉलेजात जाणारी मुलेही सहजतेने अंमली पदार्थांच्या आहारी जात असल्याचे प्रसारमाध्यमांद्वारे कळते. देशाचे उज्वल भवितव्य ज्यांच्यावर अवलंबून आहे ते होतकरू तरुण अंमली पदार्थांच्या प्रभावाखाली आपले वर्तमान आणि सोनेरी भविष्य अंधकारमय करत आहेत आणि येणारी पिढी म्हणून आपण देशाला पोकळ, आजारी, दुर्बल, अविकसित, समस्याग्रस्त आणि गुन्हेगारी प्रवृत्तीचा तरुण सोपवत आहोत.

ग्लोबल बर्डन ऑफ डिसीज स्टडीनुसार, २०१७ मध्ये जगभरात सुमारे ७.५ लाख लोक अंमली पदार्था मुळे मृत्युमुखी पडल्याचा अंदाज आहे. एम्सच्या अहवालानुसार, सुमारे १८ लाख प्रौढ आणि ४.६ लाख मुले इनहेलर व्यसनींच्या श्रेणीत येतात. पंजाबमधील एकूण कैद्यांपैकी किमान ३० टक्के कैदी बेकायदेशीर अंमली पदार्थ बाळगल्याप्रकरणी तुरुंगवास भोगत आहेत. सरकारी अहवाल दाखवतात की, २०१८ मध्ये भारतात २३ दशलक्ष ओपिओइड व्यसनी होते, जे १४ वर्षांत पाच पटीने वाढले आहे. एनजीओच्या सर्वेक्षणानुसार भारतात उपचारांची आवश्यकता असलेल्या ६३.६ टक्के रुग्णांचे वय १५ वर्षांपेक्षा कमी आहे. युनायटेड नेशन्सच्या ऑन ड्रग्ज अँड क्राइमच्या अहवालानुसार, भारतात अंमली पदार्थांच्या गैरवापरात गुंतलेल्या सुमारे १३ टक्के लोक २० वर्षांपेक्षा कमी वयाचे आहेत. भारतात दरवर्षी २० दशलक्ष मुले आणि दररोज सुमारे ५५००० मुले तंबाखूचे व्यसनी बनतात आणि अमेरिकेत दररोज धूम्रपान करणाऱ्या ३००० नवीन मुलांच्या तुलनेत ही संख्या भयावह आहे.

देशांतर्गत अल्कोहोलिक पेय उद्योग ८-१० टक्क्यांनी वाढण्याची शक्यता आहे. आंतरराष्ट्रीय अंमली पदार्थ नियंत्रण मंडळाच्या २०२३ च्या वार्षिक अहवालानुसार, जगातील ३९ टक्के अफू वापरणारे दक्षिण आशियामध्ये राहतात. जागतिक स्तरावर, हेरॉइनची बाजारपेठ ४३०-४५० टन वार्षिक प्रवाहाचे प्रतिनिधित्व करते. २०१८ मध्ये भारतीय सैन्याने केलेल्या अभ्यासानुसार, जम्मू आणि काश्मीरमधील सुमारे ४० टक्के तरुण अमली पदार्थांच्या व्यसनाने ग्रस्त आहेत, जे २००८ मध्ये पाच टक्के पेक्षा कमी होते. भारतात, अंमली पदार्थांचे सेवन आणि दारूच्या व्यसनामुळे आत्महत्या करणाऱ्यांची संख्या गेल्या दशकात दुपटीने वाढली आहे. जागतिक ड्रग अहवाल २०२३ नुसार, जागतिक स्तरावर, २०२१ मध्ये २९६ दशलक्षाहून अधिक लोकांनी अंमली पदार्थांचा वापर केला, जो मागील दशकाच्या तुलनेत २३ टक्क्यांनी वाढला आहे. दरम्यान, अंमली पदार्थांच्या वापराच्या विकारांनी ग्रस्त लोकांची संख्या ३९.५ दशलक्ष झाली आहे, जी १० वर्षांत ४५ टक्क्यांनी वाढली आहे. आफ्रिकेत उपचाराधीन ७० टक्के लोक ३५ वर्षांपेक्षा कमी वयाचे आहेत.

जागतिक स्तराबरोबरच भारतातही अमली पदार्थांचा व्यापार झपाट्याने वाढत आहे, अंमली पदार्थांचे व्यसन माणसाला जिवंत प्रेत बनवते आणि वाईट, गुन्हेगारी, नकारात्मक विचारांना प्रोत्साहन देते. व्यसनामुळे आर्थिक, सामाजिक, कौटुंबिक आणि प्रामुख्याने शारीरिक आणि मानसिक नुकसान होते. आजच्या पालकांनी मुलांबाबत अधिक सजग राहण्याची गरज आहे. आपली मुलं आपली जबाबदारी आहेत, आई-वडील व्यस्त असल्याची सबब मुलांच्या भविष्यासाठी घातक ठरू शकते. मुलांवर आंधळेपणाने विश्वास ठेवू नका, मुलांना वेळ द्यायला शिका, मोठ्यांचे वागणे मुलांसमोर अनुकरणीय असावे. मुलं आपला दिनक्रम कसा घालवतात, कोणाला भेटतात, सोबतीला कोणते मित्र असतात, मुलं बाहेर कुठे पैसे खर्च करतात, हे सगळं पालकांनी जाणून घ्यायला हवं. आधुनिकता विचारात असावी, देखाव्यात नाही, त्यामुळे मुलांना प्रापंचिक ज्ञान, व्यावहारिक ज्ञान आणि चांगल्या-वाईटाची समज पालकांकडून मिळाली पाहिजे. आजच्या काळात मूल्ये, सत्य आणि नैतिकता झपाट्याने लोप पावत आहे, जी मुलांसाठी तसेच पालकांसाठीही खूप महत्त्वाची आहे.

अंमली पदार्थांचे व्यसन सोडा, जागरूक व्हा, मुलांना चांगले आणि पोषक वातावरण द्या जेणेकरून ते देशाचे उज्ज्वल भविष्य बनू शकतील. आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय, राज्य आणि स्थानिक स्तरावरील संगठन, सरकार, स्वयंसेवी संस्था व्यसनमुक्तीसाठी आणि अंमली पदार्थांच्या तस्करीच्या विरोधात काम करतात. भारत सरकारच्या नशा मुक्त भारत अभियान अंतर्गत, राष्ट्रीय टोल फ्री व्यसनमुक्ती हेल्पलाइन १४४४६ वर संपर्क साधू शकतो.

**-डॉ. प्रितम भि. गेडाम**



## बदलते तंत्रज्ञान

# आता कोणत्याही भागात मिळवा सुपरफास्ट इंटरनेट



Elon Musk यांच्या मालकीच्या डरिलशद कंपनीने एक मोठी घोषणा केली आहे. कंपनीने आपले बहुप्रतिक्षित Starlink Mini डिव्हाईस लॉन्च केले आहे. हा एक अतिशय लहान आकाराचा सॅटेलाईट इंटरनेट अँटिना आहे. याला तुम्ही आपल्या बॅगेत टाकून कुठेही घेऊन जाऊ शकता आणि याद्वारे कुठल्याही भागात सुपरफास्ट इंटरनेट मिळवू शकता. या सॅटेलाईट अँटिनामध्ये इनबिल्ट वायफाय सपोर्ट आहे, ज्याच्या मदतीने तुम्ही तुमचा फोन किंवा लॅपटॉप कनेक्ट करू शकता.

मिळालेल्या माहितीनुसार, या Starlink Mini kit ची किंमत ५९९ अमेरिकन डॉलर (भारतीय रुपये ५०,०५४) आहे. Starlinkचे ग्राहक चळपळ Roam service घेऊ शकतात. परंतू, कंपनीने सध्या यात लिमिटेड डेटा दिला आहे. म्हणजेच, ग्राहकाला महिन्याला फक्त 50GB डेटा मिळेल. भविष्यात ही लिमिट वाढवली जाऊ शकते.

**SpaceX च्या स्टारलिंक व्हीपीने दिली माहिती**

SpaceX च्या स्टारलिंक इंजीनियरिंगचे व्हीव्ही माइकल निकोलने द प्लॅटफॉर्मवर केलेल्या पोस्टमध्ये याबाबत माहिती दिली. तसेच, लवकरच हे डिव्हाईस आंतरराष्ट्रीय बाजारात सुरू होणार असल्याचे सांगितले.


**Starlink Mini चे वजन आणि स्पीड**

Starlink Mini चे वजन फक्त १.१३ किलोग्राम आहे. कंपनीच्या स्टँडर्ड डिशच्या तुलनेत हे ६० टक्के हलके आहे. या सर्व्हिस अंतर्गत सध्या १०० Mbps ची स्पीड मिळेल. भविष्यात ही स्पीड वाढवली जाऊ शकते.

**२०१९ में Starlinkची सुरुवात**

SpaceX ही इलॉनम मस्क यांची कंपनी आहे. ही कंपनी अंतराळात जाणाऱ्या स्पेसफ्रॉटसाठी रॉकेट लॉन्चर आणि इतर सामान बनवण्याचे काम करते. SpaceX ने २०१९ मध्ये Starlink ची सुरुवात केली होती. याद्वारे कंपनी सॅटेलाईटवर आधारिक इंटरनेट सेवा पुरवते. आतापर्यंत कंपनीने ६ हजारांपेक्षा जास्त सॅटेलाईट अंतराळात पाठवल्या आहेत. सध्या जगभरात याचे ३० लाख ग्राहक असून, १०० पेक्षा जास्त देशांमध्ये सेवा आहे.

# लोककल्याणकारी राजे राजर्षी शाहू महाराज



## निमित्त

महाराष्ट्रातील समाज सुधारक राजर्षी शाहू महाराजांचा जन्म २६ जुन १८७४ रोजी कागलच्या घाटगे घराण्यात झाला. कागलचे जहागीरदार जयसिंगराव आबासाहेब घाटगे हे त्यांचे जन्मदाते वडील राधाबाई ही त्यांची जन्मदाती माता. शाहू महाराजांचे मूळ नाव यशवंतराव होते. ते दहा वर्षांचे असताना कोल्हापूरचे राजे चौथे शिवाजी यांची राणी आनंदीबाई हिने १८ मार्च १८८४ रोजी त्यांना दत्तक घेतले व ते कोल्हापूर संस्थानाचे छत्रपती शाहू महाराज झाले.

**राजर्षी शाहू महाराज**
**बालपण आणि शिक्षण**

इ. स. १८८५ मध्ये त्यांना शिक्षणासाठी राजकोट येथे पाठविण्यात आले. तेथे त्यांनी चार वर्षे शिक्षण घेतले. त्यानंतर ते कोल्हापूरला परतल्यावर धारवाड येथे शिक्षणासाठी गेले. तेथे सर एस.एम. क्रेजर यांच्या मार्गदर्शनाखाली राज्यकारभार, इतिहास, इंग्रजी भाषा इत्यादी विषयांचे शिक्षण घेतले. धारवाड येथे शिक्षण घेत असतानाच लक्ष्मीबाई यांच्याबरोबर एप्रिल १८९१ रोजी शाहू महाराजांचा विवाह झाला. शिक्षणक्रम संपल्यानंतर वयाच्या विसाव्या वर्षी २ एप्रिल १८९४ रोजी शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानच्या राज्यकारभाराची सूत्रे हाती घेतली.

छत्रपती शाहू महाराज महत्वाचे कार्य

१९०२ साली शाहू महाराजांनी पाटबंधारे धोरण घोषीत केले.

२६ जुलै १९०२ रोजी शाहू महाराजांनी कोल्हापुर संस्थानातील मागासवगीय लोकांसाठी ५० टक्के जागा राखीव / आरक्षीत ठेवल्या. आरक्षण बाबतचा हा जाहीरनामा 'करवीर गैजेट मधुन प्रकाशित करण्यात आला होता.

१९०५ साली शाहू महाराजांनी राजोपाध्याय यांची इनामे जप्त केली व छात्र जगतगुरुचे नवे पीठ निर्माण करुन मराठा जातीच्या सदाशिव बेनाडीकर यांची पीठाचे प्रमुख म्हणून नेमणुक करण्यात आली. तसेच संस्थान मध्ये निरनिराळ्या जातीचे पुरोहीत निर्माण करण्याकरीता पुरोहीत शाळा निर्माण केल्या.

१९०६ मध्ये शाहु महाराजांनी छत्रपती शाहू स्पिनींग व जिनींग मिल स्थापन केली. (२००३ मध्ये महाराष्ट्र शासनाने ही मिल बंद केली आहे) ० १९०६ साली शाहु महाराजांनी कोल्हापूर संस्थानात रात्रशाळा सुरू केल्या. तर १९०७ साली शाहु महाराजांनी मुलींसाठी रात्रशाळा सुरू केल्या.

१९०७ साली कोल्हापुरच्या पश्चिमेस ५५ किमी अंतरावर दाजीपुर जवळ भोगावती नदीवर धरण बांधुन त्याच्या जलाशयास महाराणी लक्ष्मीबाई हे नाव देण्यात आले. या धरणाचे काम सबनीस या इंजिनीअर कडुन करून घेण्यात आले. याच धरणाशेजारी शाहू महाराजांच्या मुलीच्या नावावर राधानगरी हे गाव बसविण्यात आले.

१९०८ साली शाहु महाराजांनी अस्पृश्यांसाठी मिस क्लार्क हे वस्तीगृह स्थापन केले. २० मे १९११ रोजी शाहु महाराजांनी संस्थानामार्फत विद्याथ्यांना १५ टक्के शिष्यवृत्तीची घोषणा केली. १९११ साली शाहु महाराजानी शिंपी समाजाच्या मुलांसाठी नामदेव वस्तीगृह सुरू केले. राजर्षी शाहू महाराजांना महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी 'सर्वांगपूर्ण राष्ट्रपुरुष' अशा शब्दांत यथार्थपणे गौरविलेले आहे.

**(साभार : इंटरनेट)**

## क्लिक...क्लिक...!



**रोहा : जिल्ह्यात पावसाची स्थिती सर्वत्र सारखी नाहीये. काही ठिकाणी ऊन, तर काही ठिकाणी पावसाच्या तुरळक सरी बरसत आहेत. अशा पावसात बच्चेकंपनी भिजण्याचा मनसोक्त आनंद घेत असताना टिपलेले छायाचित्र.**

## आरोग्य प्रहर

# ही फळे खाल्ल्याने आजारांशी लढण्याचीही मिळेल ताकद

आपल्या शरीराचे संरक्षण करण्यासाठी व्हिटॅमिन सी खूप महत्वाचे आहे. व्हिटॅमिन सी हे रोगप्रतिकारक शक्ती मजबूत करते. व्हिटॅमिन सी पुरेशा प्रमाणात सेवन केल्यास ह्रदयाशी संबंधित रोग, आरोग्य समस्या आणि त्वचेशी संबंधित समस्या दूर राहण्यास मदत होते. व्हिटॅमिन सी संपूर्ण आरोग्यास चालना देते. व्हिटॅमिन सी जखमा लवकर भरून काढण्या साठी खूप उपयुक्त आहे.



तसेच व्हिटॅमिन सी मुळे , कूर्चा, हाडे आणि दातांची झीज कमी होते. संत्र्यामध्ये सर्वात जास्त व्हिटॅमिन सी असते असे सर्वसाधारणपणे समजले जाते. पण आपण अशा अनेक फळांबद्दल जाणून घेऊया ज्यात संत्र्यापेक्षा जास्त व्हिटॅमिन सी असते आणि ती लिंबूवर्गीय फळे नाहीत.

**पेरू** - पेरू हे भारताच्या कानाकोपऱ्यात आढळणारे फळ आहे. पेरूमध्येही संत्र्यापेक्षा जास्त व्हिटॅमिन सी असते. १०० ग्रॅम पेरूमध्ये २२८ मिलीग्राम व्हिटॅमिन सी आढळते.

**अननस** - अननस हे अतिशय चविष्ट फळ आहे. ते जितके चवदार असेल तितकेच ते व्हिटॅमिन सीने भरलेले असते. १०० ग्रॅम अननसात ४८ मिलीग्राम व्हिटॅमिन सी असते. यामध्ये अनेक प्रकारचे अँटीऑक्सिडंट असतात जे रोगांशी लढण्यासाठी उपयुक्त असतात.

**आंबा** - आंब्याला फळांचा राजा म्हटलं जातं. सध्या सर्वत्र आंब्यांचा घमघमाट आहे. आंब्यामध्ये व्हिटॅमिन सी देखील मुबलक प्रमाणात ढळते. १०० ग्रॅम आंब्यामध्ये ३६ मिलीग्राम व्हिटॅमिन सी आढळते. आंब्यामध्ये फायबरही भरपूर प्रमाणात असते.

**कीवी** - किवीला चायनीज गूसबेरी असेही म्हणतात. किवी हे एक अतिशय चवदार फळ आहे जे थोडेसे आंबट असते. त्यात ९३ मिलीग्राम व्हिटॅमिन सी आढळते. किवीमुळे रोगप्रतिकारशक्ती देखील वाढते आणि ते कोलेस्ट्रॉल देखील कमी करते.

या फळांच्या नियमित सेवनाने तुम्हाला पोषण मिळेल, व्हिटॅमिन सी चे प्रमाणही वाढेल आणि रोगप्रतिकारक शक्तीही खूप वाढेल.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. -मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले.** पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com

# कोकण पदवीधर मतदारसंघात आज मतदान

## रायगडातील ८१ केंद्रांवर मतदान प्रक्रियेची तयारी पूर्ण

**अलिबाग : प्रतिनिधी**

विधान परिषदेच्या कोकण पदवीधर मतदारसंघत बुधावरी (दि.२६) मतदान होणार आहे. १३ उमेदवार रिंगणात आहेत. रायगड जिल्ह्यात ५४ हजार २०८ मतदार मतदानाचा हक्क बजावणार आहेत. रायगड जिल्ह्यातील ८१ मतदान केंद्रांवर बुधवारी सकाळी ७ ते सायंकाळी ६ या वेळेत मतदान होईल. निवडणुकीसाठी प्रशासन सज्ज झाले आहे.



कोकण पदवीधर मतदारसंघासाठी १३ उमेदवार निवडणूक रिंगणात असले तरी भाजपचे निरंजन डावखरे आणि काँग्रेसचे रमेश कीर यांच्या प्रमुख लढत अपेक्षित आहे. मतदारांना पसंतीक्रमानुसार मतदान करायचो असून उमेदवारांसमोर अंक लिहून पसंती क्रम द्यायचा आहे.

पसंतीक्रम लिहितांना मतदान अधिकाऱ्यांकडून दिलेल्या पेनचाच वापर करणे बंधनकारक असणार आहे, अन्यथा मत बाद होणार आहे. मतदान करताना मतदारांनी निवडणूक आयोगाने निर्धारीत केलेल्या ओळखपत्रांपैकी कोणतेही ओळखपत्र मतदान करताना सादर करणे आवश्यक असणार आहे.

सिंधुदुर्ग, रत्नागिरी, रायगड, ठाणे, पालघर या पाच जिल्ह्याचा कोकण पदवीधर मतदारसंघ आहे. या मतदारसंघात लाख २३ हजार २२२ मतदारांनी नोंदणी केली असून, यात एक लाख २७ हजार पुरूष तर ९५ हजार ५४६ महिला तर २८ तृतीयपंथी मतदारांचा समावेश आहे. रायगड जिल्ह्यातील ८१ मतदान केंद्रांवर ही निवडणूक पार पडणार आहे.

५४ हजार २०८ मतदार मतदानाचा हक्क बजावणार असून यात ३० हजार ८४३ पुरूष तर २३ हजार ३५६ महिला व इतर नऊ मतदारांचा समावेश आहे. निवडणूक सुरळीत पार पडावी यासाठी ४८६ अधिकारी, कर्मचारी आणि सूक्ष्म निरीक्षकांची नियुक्ती करण्यात आली आहे.

### प्रशासनाकडून सोयीसुविधा

***मतदान प्रक्रिया सुरळीत पार पडावी यासाठी रायगड जिल्ह्यात ५०० अधिकारी आणि कर्मचारी निवडणूक यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांना मतदान प्रक्रिया निर्विघ्न आणि सुरळीतपणे पार पाडता यावी यासाठी दोन वेळा प्रशिक्षण देण्यात आले आहे. मतदान केंद्रांवर मूलभूत सोयीसुविधांची पूर्तता करण्यात आली आहे.***

# कर्जतमध्ये पूर्ववैमनस्यातून हाणामारी; एक गंभीर जखमी

**कर्जत : प्रतिनिधी**

तालुक्यातील नांगुर्ले गावातील एका ग्रामस्थाला रस्त्यात त्याची चारचाकी गाडी अडवून पाच-सहा जणांच्या टोळक्याने जबर मारहाण केली. या मारहाणीत तो ग्रामस्थ गंभीर जखमी झाला असून त्याला प्रथमोपचार करून मुंबई येथे पुढील उपचारार्थ नेण्यात आले आहे. मारहाण करणारे पळून गेले असून या घटनेचा गुन्हा नोंदविला आहे. कर्जत पोलीस अधिक तपास करीत आहेत.



नांगुर्ले गावातील अनिल हरिश्चंद्र देशमुख (वय ४७) सकाळी नांगुर्ले-भिलवले रस्त्यावरून अपल्या चारचाकीतून साईटवर जात असताना तिघर धनगर वड्याजवळ त्यांच्या गाडीच्या पुढे चारचाकी गाडी आडवी टाकून त्यातील पाच-सहा जणांनी लोखंडी रॉडने अनिल यांना मारहाण करण्यास सुरुवात केली. या मारहाणीत त्यांच्या हाताला व पायाला गंभीर दुखापत झाली. त्यांच्याबरोबर असलेल्या अर्जुन यांनासुद्धा मारहाण करण्यात आली. त्यांना कर्जत उपजिल्हा रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. प्रथमोपचार केल्यानंतर त्यांना अधिक उपचारासाठी मुंबईला नेण्यात आले.

मारहाण करणारे पळून गेले असून या घटनेच्या गुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे. उपविभागीय पोलीस अधिकारी डी.डी. टेळे अधिक तपास पोलीस निरीक्षक सुरेंद्र गरड करीत आहेत.

# लोणावळा-पनवेल एसटी बसला खालापूर येथे थांबा देण्याची मागणी

**चौक : प्रतिनिधी**

पनवेल ते लोणावळा व लोणावळा ते पनवेल ही राज्य परिवहन विभागाची एसटी गाडी सुरू असून ती यादरम्यान सर्वच थांब्यावर थांबत असते, मात्र ती खालापूर गावात जात नसल्याने प्रवासीवर्गाचे हाल होत आहेत. त्यामुळे या एसटीला खालापुरातही थांबा देण्याची मागणी होत आहे.

राज्य परिवहन विभागाची कुर्ला नेहरूनगर आगाराची एसटी ही पनवेल ते लोणावळा व पुन्हा लोणावळा ते पनवेल असा प्रवास करते. खालापूर हे तालुक्याचे ठिकाण आहे. येथे तहसील कार्यालय, उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय, तालुका वरिष्ठ पोलीस निरीक्षक कार्यालय, तुरुंग, कनिष्ठ न्यायालय, पंचायत समिती कार्यालय, भूमि अधीक्षक कार्यालय, दुय्यम निबंधक कार्यालय, वन विभाग, जिल्हा मध्यवर्ती बँक, राष्ट्रीय बँक, पशु वैद्यकीय दवाखाना, शासकिय दवाखाना, तालुका विद्युत कार्यालय, सेतू सुविधा केंद्र, महिला व बालविकास प्रकल्प कार्यालय यांच्यासह अन्य अनेक कार्यालये या ठिकाणी असून, खालापूर नगर पंचायत कार्यालय येथे आहे. अनेक शासकीय कर्मचारी, शासकीय कामासाठी येणाऱ्या नागरिकांची संख्या अधिक आहे.

अनेकजण या गाडीने खालापूर फाटा येथे उतरून रिक्षा किंवा पायी चालत संबंधित गावात चालत जावे लागते. त्यामुळे ही गाडी दोन्ही वेळेस खालापूर गावातूनच आल्यास प्रवासी यांना सोयीचे होईल, अशी मागणी होत आहे.

# पालीत हजारो भाविक बल्लाळेश्वराच्या चरणी लीन

**पाली : प्रतिनिधी**

या वर्षातील एकमेव अंगारकी संकष्टी चतुर्थीला मंगळवारी (दि.२५) अष्टविनायक तीर्थक्षेत्र पालीत श्री बल्लाळेश्वराच्या दर्शनासाठी भाविकांनी गर्दी केली होती. पहाटेपासूनच दर्शनासाठी लांब रांगा लागल्या होत्या. पालीत जवळपास ५० हजारहून अधिक भाविक दाखल झाले होते. बल्लाळेश्वराचे दर्शन घेऊन भाविक सुखावले होते. त्यांच्या चेहऱ्यावर प्रसन्न भाव दिसून येत होता.



श्री बल्लाळेश्वर मंदिर व गाभाऱ्यात फुलांची सजावट करण्यात आली होती. श्री बल्लाळेश्वरालादेखील आभूषण व वस्त्र परिधान करण्यात आले होते, तसेच मंदिराबाहेर रांगोळी काढण्यात आली होती. येथे चांगली आर्थिक उलाढाल झाली असून येथील स्थानिक व्यावसायिक सुखावले आहेत.

भाविकांमुळे येथील हॉटेल व्यावसायिक, लोजिंग बोर्डिंगवाले, पापड, लोणचे मिरगुंड विक्रेते, पेढेवाले, सरबतवाले, छोटे-मोठे दुकानदार व इतर व्यावसायिकांचा धंदा तेजीत होता. मंदिर परिसरातील दुकाने व हॉटेल ग्राहकांनी गजबजले होते.

मंदिर परिसराला यात्रेचे स्वरुप आले होते. भाविकांच्या सोईसाठी बल्लाळेश्वर देवस्थान ट्रस्टच्या वतीन चोख व्यवस्था करण्यात आली आहे. विविध वस्तूंनी भरलेली दुकाने व गर्दी यामुळे मंदिर परिसर गजबजलेला दिसत होता.



**वर्षातील फक्त एकच अंगारकी चतुर्थी असल्यामुळे मोठ्या प्रमाणात भाविक दर्शनासाठी आले होते. या भाविकांनी दुकानातून चांगली खरेदी केली. त्यामुळे धंदा चांगला झाला आहे.**

**-राहुल मराठे, व्यावसायिक**

**एकमेव अंगारकी चतुर्थी असल्यामुळे भाविकांच्या येणाऱ्या गर्दीचा अंदाज घेऊन योग्य नियोजन करण्यात आले आहे. सुरक्षारक्षक तैनात होते. रांगेत उभे राहण्यासाठी रेलिंग व शेड उभारण्यात आली आहे. वाहने पार्क करण्यासाठी देवस्थानची दोन भव्य मोफत पार्किंगदेखील आहे.**

**-जितेंद्र गद्रे, अध्यक्ष, बल्लाळेश्वर देवस्थान ट्रस्ट**

# विद्यार्थ्यांना शाळेत एसटी पास देण्याचा कर्जतमध्ये शुभारंभ

**कर्जत : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाने अहिल्यादेवी होळकर योजनेच्या माध्यमातून कर्जत एसटी आगाराच्या वतीने शाळेत जाऊन मुलींना १०० टक्के सवलतीच्या पासचे वाटप केले. भिसेगाव येथील जय अंबे भवानी माध्यमिक विद्यालयात जाऊन मुलींना पास वितरीत करून योजनेचा शुभारंभ केला.

भिसेगाव येथील जय अंबे भवानी माध्यमिक विद्यालयात आगर व्यवस्थापिका मानसी शेळके, वाहतूक निरीक्षक दयानंद मोरे, सहाय्यक वाहतूक निरीक्षक महादेव पालवे, वाहतूक नियंत्रक वसंत बागुल आदी भेट देण्यासाठी गेले होते. मुख्याध्यापक विजय धर्माधिकारी यांनी त्यांचे स्वागत केले. या वेळी मानसी शेळके यांनी, विद्यार्थ्यांना विशेषतः मुलींना शिक्षण घेण्यासाठी आर्थिक भार पडू नये म्हणून महाराष्ट्र राज्य परिवहन मंडळाने अहिल्यादेवी होळकर योजनेंतर्गत मुलींना १०० टक्के सवलतीचा पास देण्याची योजना आणली. त्याचा शुभारंभ या शाळेपासून करीत आहोत. यामुळे मुलींचे शिक्षणाचे प्रमाण नक्कीच वाढेल, असा विश्वास व्यक्त केला.





**माणगाव : येथील उद्योजक अरुण क्षीरसागर यांची कन्या डॉ. केतकी क्षीरसागर हिने बीएएमएस पदवी संपादन केल्याने तिचे नगरसेवक अजित तारलेकर आणि मयुरा तारलेकर यांनी अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.**

## खासगी आस्थापनेतील मतदारांना दोन तासांची सवलत

**रायगड :** कोकण विभाग पदवीधर मतदार संघातील खासगी आस्थापनेवरील मतदारांना मतदानाचा हक्क बजावण्यासाठी मतदानाच्या दिवशी बुधवारी (दि. २६) मतदान कालावधीत दोन तासांची विशेष सवलत देण्यात आली आहे. खासगी आस्थापनेवर काम करणाऱ्या मतदारांसाठी जाहीर करण्यात आलेल्या विशेष दोन तासाच्या सवलतीचा लाभ घेऊन पदवीधर, शिक्षक मतदारांनी मोठ्या संख्येने मतदानाचा हक्क बजावावा, असे आवाहन उपआयुक्त (सा.प्र.)कोकण विभाग तथा सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी अमोल यादव यांनी केले आहे.


MAHAVITARAN

**TENDER NOTICE**

Following Tender is invited from Eligible Bidders under Pen Circle, Raigad District. The Details are as given below-

| Sr. No. | Tender No. | Particulars | Sale Opening, Sale Closing Dates & Bid Submission | Estimated Cost (Rs.) | Amount of EMD (Rs.) | Tender Cost Fee |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | SE/PC/Tech/ 2024-25/T-2 | Supply of T&P for Pen Circle. | Dt. 25/06/2024 To Dt. 6/07/2024 Bid Submission Date: 6.07.2024 upto15:00 hrs. | Rs. 44,00,000/- | Rs. 44,000/- | Rs. 2950/- |

The Tender Documents are available on MSEDCL Official Website http://works.mahadiscom.in/eTender/etender.

Sd/-

PRO NO - 72

SUPERINTENDING ENGINEER (PC), PEN



**जाहीर नोटीस**

सर्व लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, मौजे- उलवे, ता. पनवेल, जि. रायगड येथील खालील वर्णनाच्या भुखंडाचे भाडेपट्टा मालकीहक्क धारक मे. हरिविहार सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित यांनी सदर भुखंडामधील यांचे भाडेपट्टा मालकीहक्क त्रिपक्षीय कराराअन्वये कायमस्वरूपी आमचे अशिल मे. फ्युचर रियालिटी तर्फे भागीदार श्री जिगर विनोद त्रिवेदी यांचे लाभात हस्तांतरीत करण्याचे योजले आहे.

**भुखंडाचे वर्णन**
**मौजे- उलवे, ता. पनवेल, जि. रायगड**

| भुखंड क्रमांक | सेक्टर | क्षेत्र चौ.मी. | नोड |
|---|---|---|---|
| १ | ३ | ५७०० | उलवे |

वर नमूद भुखंडास यापुढे सोयीसाठी 'सदर भुखंड' असे संबोधण्यात आलेले आहे.

सदर भुखंडास अनुसरून कुणीही व्यक्ती, संस्था, कंपनी, भागीदारी इत्यादींचा कुठल्याही प्रकारचा दान, गहाण, तारण, खरेदी, बयाणा, कर्ज, पोटगी, अन्न-वस्त्र, निवारा, वहिवाट, बक्षिस इत्यादीद्वारे मालकी अथवा इतर कसलाही हक्क हितसंबंध असल्यास, सदर जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसांचे आत आपले हक्क हितसंबंधाच्या स्वरूपासहित प्रथमदर्शनी पुराव्यासह खालील सही करणार यांसकडे खाली नमूद पत्यावर आपल्या लेखी हरकती रजिस्टर पोस्टाद्वारे अथवा समक्ष दाखल कराव्यात, सदर १५ दिवसांचे आत कुणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास आमचे अशिल सदर वर नमूद भुखंडाचा त्रिपक्षीय भाडेपट्टा करार व हस्तांतरण कायदेशिरपणे पूर्ण करतील व त्यानंतर मागावून आलेल्या कसल्याही हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक असणार नाहीत.

**ठिकाण - पनवेल**
**दिनांक -२५/०६/२०२४**

**सही/-**
**ॲड. शरद रामचंद्र जाधव,**

कार्यालयीन पत्ता - कार्यालय क्र. ००१, तळमजला, रॉयल प्राईड, भुखंड क्र. ११३, एम.सी.सी.एच सोसायटी, पनवेल, जि. रायगड



**जाहीर नोटीस**

तमाम लोकांस या जाहिर नोटीसीने कळविण्यांत येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत ही श्री. अनंता नथु गायकर वगैरे ६, रा. भिंगारवाडी, ता. पनवेल, जि. रायगड यांच्या प्रत्यक्ष मालकी व ताबे वहिवाटीची मिळकत असून, सदरील विद्यमान मालकांनी सदरील मिळकत आमचे अशिलांना विकण्याचे मान्य व कबुल केले आहे. तसेच त्यांनी सदर मिळकत ही पुर्णतः निर्वेध व निर्जोखिम असून, त्यांना सदरील मिळकत विकण्याचा, पुर्ण हक्क व अधिकार असल्याचा भरवसा त्यांनी आमचे अशिलांना दिला आहे. सबब सदर मिळकतीशी अन्य कोणाचाही कसलाही करार, मदार, गहाण, दान, लिज, लिन, पोटगी इ. अगर कोणत्याही प्रकारवा हक्क व अधिकार अगर कोणत्याही प्रकारचे महसुली अगर दिवाणी दावे प्रलंबित असल्यास, प्रस्तुत नोटीस प्रसिध्द झालेपासून ७ दिवसांत आमचे खालील पत्त्यावर मुळ कागदपत्रे दाखवून आमची खात्री पटवून द्यावी. उपरोक्त मुदतीत हरकत न आल्यास, सदरील मिळकत ही पुर्णतः निर्वेध, निजोंखीम व निष्कर्जी असून विद्यमान मालकांस तिचे पूर्ण मार्केटेबल टायटल आहे, तसेच अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचा काहीएक हक्क, अधिकार व हितसंबंध नाही व असल्यास तो त्यांनी जाणीवपुर्वक सोडून दिलेला आहे. असे समजुन आमचे अशिल पुढील व्यवहार पुर्ण करतील, मुदतीनंतर कोणाचाही कसलीही हरकत/तकार विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

**मिळकतीचे वर्णन (परिशिष्ट)**
**मौजे- भिंगारवाडी, ता. पनवेल, जि. रायगड येथील जमिन मिळकत**

| अ. क्र. | गट क्र. व उपविभाग | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पैसे | मालकाचे नाव |
|---|---|---|---|---|
| १ | ७०/१/३ | ०-२९-४०<br>पो.ख. ०-०४-३०<br>एकूण ०-३३-७० | ५.०० | श्री. अनंता नथु गायकर<br>श्री. मोतीराम नथु गायकर<br>श्री. राजाराम नथु गायकर<br>श्री. द्वारकानाथ नथगायकर<br>श्रीमती मंदाबाई संजय पारींगे<br>श्री. बाळाराम नथु गायकर |

येणेप्रमाणे नोटीस दिली.

**ठिकाण - पनवेल**
**दिनांक -२५/०६/२०२४**

**सही/-**
**ॲड. एस. के. राणे**
पत्ता:- शॉप नं. १२३, नगरपालिका कॉम्प्लेक्स,भाजी मार्केटजवळ, पनवेल, जि. रायगड ४१०२०६. मोबा. नं. ९८१९८६९२१२



**पनवेल महानगरपालिका**
**जाहीर नोटीस सूचना**

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम १९७५ च्या महाराष्ट्र अधिनियमानुसार केलेल्या सुधारणा विचारात घेऊन उक्त अधिनियम कलम ८ (३) अन्वये या नोटीसीद्वारे असे जाहीर करण्यात येते की,

| अ.क्र. | अर्जदाराचे नाव व पत्ता | बाधित झाडांची संख्या | झाडे तोडण्याचे कारण |
|---|---|---|---|
| १. | M/s. Dream Developers Through Its Partner Mr. Vikesh K. Choithramani & Mr. Vicky Artwani, Survey No.15/10 & 16/1/A, At- Rohinjan, Tal-Panvel, Dist- Raigad. | ०४ आंबा - तोडणे | पनवेल महानगरपालिका हद्दीतील Survey No.15/10 16/1/A, At-Rohinjan, Tal-Panvel, Dist-Raigad या भूखंडाच्या आवारातील २९ झाडांपैकी ०४ आंबा झाडे नविन इमारतीचे बांधकाम करणेस बाधित होत आहेत. |
| २. | मे. ऑरेंज बिल्डर्स ॲन्ड डेव्हलपर्स तर्फे प्रोपा. आबुतालिब खान शमशुद्दीन, एफ-२, दुकान क्र.०१, सेक्टर १५, फेज १, नेरुळ. | ०१ बाभूळ - तोडणे | पनवेल महानगरपालिका हद्दीतील भुखंड क्र.२०, सेक्टर ०४, तळोजे पांचनंद, ता. पनवेल, जि. रायगड या भूखंडाच्या आवारातील ०१ बाभूळ झाड नविन इमारतीचे बांधकाम करणेस बाधित होत आहेत. |
| ३. | Secretary / Chairman, Arihant Anaya C.H.S., Plot No.04, Sector 35 G, Kharghar, Tal-Panvel, Dist- Raigad | ०३ पाम - तोडणे | पनवेल महानगरपालिका हद्दीतील Arihant Anaya C.H.S., Plot No.04, Sector 35 G, Kharghar, Tal-Panvel, Dist-Raigad या सोसायटीच्या आवारातील पहिल्या मजल्यावरील ०३ पाम झाडांची मुळे वाढुन इमारतीच्या भिंतीमध्ये गेल्याकारणाने गळती होत असल्याने तसेच इमारतीच्या बांधकामाचे नुकसान होत आहे. |

सदर प्रस्तावास वृक्ष तोडण्याची / पुनर्रोपण परवानगी देण्याचा वृक्ष प्राधिकरणाचा इरादा आहे. याबाबत नागरिकांच्या काही हरकती अगर सूचना असल्यास ही सूचना प्रसिध्द झालेपासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरूपात योग्य त्या कागदपत्रांसह पनवेल महानगरपालिकेच्या वृक्ष प्राधिकरण व उद्यान विभागामध्ये सादर करावयात. मूदतीत हरकती न आल्यास सदरची झाडे तोडणेस / पनुर्रोपण करणेस वरील अधिनियमानुसार सशर्त परवानगी देणेबाबत पुढील कार्यवाही करण्यास येईल, याची नोंद घ्यावी.

**जा.क्र. पमपा/जनसंपर्क/३१२४/प्र.क्र. २७०/२७१/२०२४**
**दिनांक :- २५/०६/२०२४**

**सही/-**
**उपायुक्त**
**पनवेल महानगरपालिका**

# जलवाहिनीचे पाईप ठेवले पदपथावर

## रस्त्यावर आल्यास अपघाताची शक्यता

**नवी मुंबई : बातमीदार**

सीबीडी-बेलापूर येथे आग्रोळी गावाजवळ असलेल्या पदपथावर पालिकेने जलवाहिन्या बदलण्यासाठी आणलेले पाईप ठेवले आहेत. हे भले मोठे पाईप अडसर ठरू लागल्याने रहिवाशांना नाईलाजास्तव रस्त्यावर चालावे लागत आहे. त्यामुळे जलवाहिनीचे पाईप हटवून पदपथ मोकळा करण्याची मागणी नागरिक करत आहेत.

नवी मुंबई शहरात महापालिकेतर्फे काही ठिकाणी जलवाहिनी टाकण्याचे काम सुरू आहे. पावसाळादरम्यान कोणत्याही प्रकारचे खोदकाम करण्यास परवानगी दिली जात नाही. त्यामुळे जलवाहिनी टाकण्याच्या काम थांबले आहे. त्यामुळे या कामासाठी आणलेले जलवाहिन्यांचे सुट्टे भाग म्हणजेच भले मोठे पाईप नवी मुंबई शहरातील पदपथांवर ठेवण्यात आले आहेत. सीबीडी-बेलापूर येथील आग्रोळी गावानजिक सिडको अर्बन हार्ट येथील पदपथावर जलवाहिन्यांचे सुट्टे भाग ठेवण्यात आले आहेत. सीबीडीमधील



सिडको अर्बन हार्ट येथील सदर मुख्य रस्ता असून, या ठिकाणी पोलीस मुख्यालय, सिडको भवन, कोकण भवन येथे हजारो नागरीक येत असतात. तसेच येथील रस्ता सायन- पनवेल महामार्गाला जोडला गेला आहे. त्यामुळे या ठिकाणी नेहमीच वाहनांची वर्दळ असते. याशिवाय नागरिकांचीदेखील ये जा असते. त्यातच येथील पदपथावर जलवाहिन्या ठेवल्यामुळे पादचाऱ्यांना रस्त्यावरून चालावे लागत आहे.

पावसाळ्यात ठेवण्यात आलेले जलवाहिन्यांचे सुटे भाग खाली घसरुन रस्त्यावर येऊन अपघात होण्याची दाट शक्यता आहे. त्यामुळे पदपथावरील जलवाहिन्यांचे सुटे भाग तत्काळ हटवावे, अशी मागणी स्थानिक नागरिक करीत आहेत.

**हटविण्याची मागणी**

पाईप एकावर एक रचले आहेत, मात्र हे पाईप घसरल्यास रस्त्यावर पसरून अपघात होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. पालिकेने हे पाईप सुरक्षित ठिकाणी हलवावेत, अशी मागणी होत आहे.

**नवी मुंबई महापालिकेतर्फे फेरीवाल्यांनी पदपथावर अतिक्रमण केल्यास त्यांच्यावर कारवाई करण्यात येते, मात्र दुसरीकडे महापालिकेनेच पाईप पदपथावर ठेवले असल्याने महापालिकेवर कारवाई कोण करणार? सामान्य माणसाला एक न्याय आणि महापालिकेच्या विभागाला एक न्याय का? पदपथावरील पाईपमुळे अपघात होण्याची शक्यता आहे.**
**-सुधीर दाणी,**
**नागरिक, सीबीडी-बेलापूर**

# बेलापूर विभागात अनधिकृत बांधकामावर धडक कारवाई

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनानुसार सर्वच विभागांमध्ये अतिक्रमण विभागाचे उपायुक्त डॉ. राहुल गेठे यांच्या नियंत्रणाखाली करण्यात येत आहे.

या अनुषंगाने बेलापूर सेक्टर ३६, करावेगाव येथील प्रतिक संताजी नाईक यांच्या घर क्र. ९९६ च्या अनधिकृत बांधकामास ए विभाग बेलापूर कार्यालयामार्फत महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ मधील कलम ५४ अन्वये नोटीस बजाविण्यात आलेली होती. त्यास अनुसरून संबधितांनी हे अनधिकृत बांधकाम स्वत:हून हटविणे आवश्यक होते, परंतु त्यांनी ते अनधिकृत बांधकाम सुरू ठेवले होते.



त्यामुळे ए विभाग कार्यालय बेलापूर मार्फत तोडक कारवाई हाती घेऊन हे अनधिकृत बांधकाम निष्कासित करण्यात आले. बेलापूर विभागाचे सहा. आयुक्त तथा विभाग अधिकारी शशिकांत तांडेल यांच्या नियंत्रणाखाली, कनिष्ठ अभियंता मयुरेश पवार व स्वप्निल तारमळे व संबंधित कर्मचाऱ्यांनी १२ मजूर, तीन हॅमर, दोन गॅस कटर यांच्या सहाय्याने अतिक्रमण विभागाकडील पोलिसांच्या उपस्थितीत ही मोहीम झाली.

# आमदार मंदा म्हात्रेंच्या प्रयत्नातून नवी मुंबईला सौरऊर्जेची झळाळी

**नवी मुंबई : बातमीदार**

वीज निर्मिती आणि सौरऊर्जा वापरात आपला देश जगात सहाव्या क्रमांकावर आहे. याच अनुषंगाने बेलापूरच्या आमदार मंदा म्हात्रे यांच्या प्रयत्नातून नवी मुंबई महापालिका क्षेत्रात सोलर हायमास्टकरिता रक्कम २५ कोटी रुपये निधी उपलब्ध केला आहे. सौरउर्जेचा प्रभावी वापर करून नवी मुंबईकरांना प्रकाशमान करण्याचे महत्त्वाचे पाऊल आमदार मंदा म्हात्रे यांनी उचलले आहे.

या वेळी बोलताना आमदार मंदा म्हात्रे यांनी सांगितले की, वाशी पासून ते बेलापूर पर्यंतच्या विभागामध्ये सर्व शाळा व महाविद्यालयासमोरील रस्ते, मुख्य चौक, बाजारपेठा, उद्याने, मैदाने, वाणिज्य संकुले आदी महत्वाच्या ठिकाणी सौरउर्जेवर चालणारे सोलर हायमास्ट व पथदिवे बसविण्यात आले असल्याने मनपाची लाखो रुपयांच्या वीजदेयकांची बचत झाली असून रस्त्यावर लख्ख प्रकाश मिळाला आहे.

यासाठी उपलब्ध संपूर्ण निधी खर्च करून



सदरचे काम पूर्ण झाले आहे. नवी मुंबई शहरात सौरउर्जेवर चालणारे हायमास्ट व पथदिवे बसविण्याकरिता मागील अनेक महिने सरकार दरबारी पाठपुरावा सुरू होता. अखेर महायुती सरकारच्या दूरदृस्तीमुळे २५ कोटी रुपयांचे विशेष अनुदान मिळवता आले. सौरऊर्जेवरील हायमास्ट व पथदिवे बसविण्याकरिता मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे मोलाचे सहकार्य लाभल्याने आमदार मंदा म्हात्रे यांनी अवर्जून सांगितले.

# कांदा बटाटा मार्केटमधील पाणी जोडणी पूर्ववत

## व्यापाऱ्यांनी मानले विजय नाहटा यांचे आभार

**नवी मुंबई : बातमीदार**

कांदा बटाटा मार्केटची इमारत धोकादायक झाल्याचे कारण पुढे करून तेथील पाणी जोडणी कापण्याचे पालिका प्रशासनाने आदेश देऊन दोन दिवसांपूर्वी पाणी जोडणी तोडण्यात आली होती. वीज जोडणी दोन दिवसानंतर कट करण्यात येणार होते. त्यामुळे व्यापारी वर्गात नाराजी पसरून भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. ही उदभवलेली समस्या घेऊन कांदा बटाटा व्यापारी शिवसेना उपनेते विजय नाहटा यांच्याकडे आले होते.

कांदा बटाटा मार्केट मधील व्यापारी संजय पिंगळे, अनिल गटकळ, कारभारी दाभाडे, राजु मणियार, संजय छेडा, हेमंत पारख, इरफान शेख आणि विकास गाढवे यांनी शिवसेना उपनेते विजय नाहटा यांची भेट घेऊन निवेदनाद्वारे पाणी जोडणी पूर्ववत करण्याची विनंती केली.




विजय नाहटा यांनी व्यापाऱ्यांच्या समस्या समजून घेत पालिका आयुक्त कैलास शिंदे यांना व्यापाऱ्यांच्या समस्या समजावून सांगितल्या. व्यापार कसा? व कुठे करायचा आणि कांदा बटाट्याचा तुटवडा झाला तर वेगळ्या समस्या निर्माण होऊन गंभीर परिस्थिती निर्माण होऊ शकते. म्हणून कांदा बटाटा मार्केटमधील पाणी जोडणी पूर्ववत करावी, अशी विनंती केली. नाहटा यांच्या विनंती नुसार पालिका आयुक्त कैलास शिंदे यांनी प्रशासनाला आदेश देऊन कांदा बटाटा मार्केट येथील नळ जोडणी करण्याचे आदेश दिले. पाण्याची जोडणी केल्यामुळे कांदा बटाटा मार्केट मधील व्यापाऱ्यांच्या शिष्टमंडळाने आभार मानले. कांदा बटाटा मार्केटमध्ये पाण्याचे कनेक्शन पूर्ववत झाल्याने व्यापारी वर्गात आनंदाचे वातावरण पसरले आहे.

# नवी मुंबई मनपा आयुक्तांकडून विभागनिहाय अचानक पाहणी

**नवी मुंबई : बातमीदार**

पालिकेचा कारभार लोकाभिमुख व गतीमान होण्यासोबतच कार्यालयीन शिस्तीवरही नमुंमपा आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांचे बारकाईने लक्ष असून आज त्यांनी कोणतीही पूर्वकल्पना न देता मुख्यालयातील सर्व विभागांना अचानक भेट देत पाहणी केली. या वेळी त्यांच्या समवेत प्रशासन विभागाचे उपायुक्त शरद पवार उपस्थि होते.

या वेळी आयुक्तांनी अधिकारी, कर्मचारी यांची कार्यालयातील उपस्थिती वेळेवर असणे अनिवार्य असल्याचे नमूद करीत प्रत्येक विभागप्रमुखाने त्यांच्या अधिनस्त कर्मचारी वेळेवर येत असल्याची खात्री करून घ्यावी, असे स्पष्ट निर्देश दिले.

कार्यालयातील नस्ती व कागदपत्रे



शासकीय नियमावलीनुसार कपाटांमध्ये ठेवलेले असावेत याची विशेष दक्षता घेण्यात यावी व विभागप्रमुखांनी त्यांच्या विभागात त्या पध्दतीने अंमलबजावणी होत असल्याची खातरजमा करून घ्यावी, असेही आयुक्तांनी निर्देश दिले.

मुख्यालयातील प्रत्येक विभागात नागरिक मोठ्या संख्येने भेटी देत असल्याने सौंदर्याला बाधा पोहचणार नाही अशा प्रकारे स्वच्छ सर्वेक्षण व माझी वसुंधरा अभियानाचे संदेश प्रसिध्दी करण्यात यावेत, असेही आयुक्तांनी सूचित केले.

या वेळी स्वच्छतागृहांचीही तपासणी करून आणखी सुधारणा करण्याच्या सूचना करतानाच वॉटर कुलरची अंतर्गत स्वच्छता तसेच त्याच्या आजुबाजूच्या परिसराची स्वच्छता नियमीतपणे होत राहील याकडे काटेकोर लक्ष देण्याचे निर्देश देण्यात आले.

सीसीटिव्ही कंट्रोल रुममधील अंतर्गत व्यवस्थापनामध्ये अधिक सुसूत्रता आणण्याचे निर्देशित करीत त्या ठिकाणची माहिती त्वरीत उपलब्ध होण्याच्या दृष्टीने कार्यप्रणाली सक्षम करावी, असे आयुक्तांमार्फत निर्देशित करण्यात आले. कक्षातील हॉटलाईन व संपर्कासाठीच्या दूरध्वनी लाईन्स कायम कार्यान्वित राहतील याची विशेष दक्षता घेण्याचे आयुक्तांमार्फत सूचित करण्यात आले. नवी मुंबई महापालिका मुख्यालयाप्रमाणेच विभाग कार्यालये व इतर कार्यालयांमध्येही अशा प्रकारची कार्यप्रणाली अंमलात आणावी असेही आयुक्त डॉ. शिंदे यांनी निर्देशित केले.

# उरण महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय योग दिन

**उरण : रामप्रहर वृत्त**

कोकण ज्ञानपीठ उरण वाणिज्य व कला महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने दहावा आंतरराष्ट्रीय योग दिवस महाविद्यालयात साजरा करण्यात आला.

महाविद्यालयाचे प्राचार्य के. ए. शामा यांनी विद्यार्थ्यांनी चांगल्या सवयी आत्मसात करून निरोगी आणि सुखी जगण्याचा मार्ग स्वीकारावा व योगासने तसेच आर्ट ऑफ लिविंग च्या माध्यमातून शरीर तंदुरुस्त ठेवण्याचा प्रयत्न करावा असे सांगितले. या वेळी प्रमुख पाहुण्या प्रतिभा



गोवर्धन उईके (शिक्षण विभाग, पंचायत समिती उरण) यांनी शरीराचे आरोग्य व मनाचे आरोग्य महत्त्वाचे असल्याचे सांगून विद्यार्थ्यांनी नैराश्यातून बाहेर येण्यासाठी आर्ट ऑफ लिविंग अत्यंत महत्त्वाचे असल्याचे सांगितले. त्यामुळे सकारात्मक दृष्टिकोन प्राप्त होतो व जगण्याचा मार्ग सापडतो असे प्रतिपादन केले. त्यांनी विविध प्रात्यक्षिकाद्वारे प्राणायामाचे प्रकार विद्यार्थ्यांना शिकवले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व प्रास्ताविक प्रा. डॉ. दत्ता हिंगमिरे यांनी तर आभार प्रा.डॉ. एम.जी. लोणे यांनी व्यक्त केले. याप्रसंगी गोवर्धन उईके, आय क्यू ए.सी समन्वयक डॉ. ए. आर.चव्हाण सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

# ट्रॅक्टरच्या सहाय्याने नांगरणीला सुरुवात

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

खालापूर तालुक्यातील काही भागात पावसाने दमदार हजेरी लावली असून वेळेवर पाऊस आल्याने शेतकरी आनंदीत झाला आहे. शेतीच्या नांगरणीला सुरूवात झाली आहे. शेतकऱ्यांचा पारंपरिक मित्र असलेल्या बैलांची जागा आत्ता ट्रॅक्टरने घेतली आहे. त्यामुळे शेतकरी ट्रॅक्टरच्या सहाय्याने नांगरणी करताना दिसत आहेत.

या परिसरातील जवळपास सर्वच जमिनी धनिकांच्या आहेत. अनेक शेतकऱ्यांनी आपल्या जमिनी विकल्या आहेत, परंतु जे हाडाचे शेतकरी आहेत, त्यांनी आपल्या जमिनीत मोती उगविण्याचा प्रयत्न सुरू ठेवला आहे. त्याला आधुनिक यंत्रांची जोड देण्यात येत आहे. अनेक शेतकऱ्यांपर्यंत शासनाच्या योजना पोहचत नाहीत. नांगरणीसाठी बैल नाहीत. कारण बैल पाळणे बऱ्याच जणांना विविध कारणांमुळे परवडत नाही. मनुष्यबळ असूनदेखील कुणीही मेहनतीने काम करण्याची तयारी दाखवत नाही.

कमी श्रमात काम करून पैसे मिळविण्यासाठी प्रत्येकजण धावत असल्याने पारंपरिक शेती नष्ट होण्याच्या



मार्गावर आहे, पण काही शेतकरी नेटाने शेती करत आहेत. बैल जुंपून शेती नांगरण्यासाठी अनेक दिवस जातात. त्यामुळे खूप मेहनत घ्यावी लागते. ट्रॅक्टरने काही तासात नांगरणी होते. त्यामुळे बैल पाळण्याकडे लोकांचा कल कमी झाला आहे. या आधुनिक तंत्रज्ञानाच्या वापराबरोबर पूर्वीसारखी एकत्रित शेती केल्यास मजूर, पैसा याची बचत होईल.

# वाशी मासळी, भाजी मार्केटचे लवकरच होणार लोकार्पण

**नवी मुंबई : बातमीदार**

वाशी सेक्टर १ येथील मासळी व भाजी मार्केट सुमारे ३ वर्षांपूर्वी बनून तयार झालेले असतानाही पालिका प्रशासनाने ते मार्केट सुपूर्द केलेले नाही. त्यामुळे विक्रेते व सामान्य नागरिकांची गैरसोय होत आहे. याबाबत भाजपचे सामाजिक कार्यकर्ते ॲड. अंशु वर्धन यांनी पाठपुरावा सुरू केला होता. अनेक निवेदने, पत्रे देऊनही प्रशासन यावर तोडगा काढत नसल्याने किवा लोकर्पणही करत नसल्याने ॲड. अंशु वर्धन यांनी आंदोलन करण्याचा इशारा दिला होता. त्यानंतर खडबडून जागे झालेल्या पालिका प्रशासनाने या मार्केटचे लोकार्पण करण्याचे आश्वासन दिले आहे.

ॲड. अंशु वर्धन यांनी सदर मार्केटमधील मच्छीमार आणि भाजीपाला मार्केटशी संबंधित विविध लहान-मोठ्या समस्या आणि विक्रेत्यांच्या गरजा याविषयीच्या समस्यासुद्धा आधीच प्रशासनाकडे मांडल्या होत्या. ज्यामध्ये मार्केटमधील व्यापाऱ्यांसाठी शौचालय, लाईट्स इत्यादी समस्यांचा समावेश आहे. माजी महानगरपालिका आयुक्त व विद्यमान आयुक्त डॉ. कैलास शिंदे व सहाय्यक आयुक्त सागर मोरे तसेच संबंधित अधिकाऱ्यांच्या भेटी घेऊन त्यांना वास्तुस्थिती निदर्शनास आणून दिली होती. त्यानंतर नवी मुंबई महापालिका अधिकाऱ्यांनी सदर मार्केटची पाहणी केली व लवकरात लवकर वाशी सेक्टर १- येथील मार्केटमधील सर्व समस्या सोडवून लोकार्पण करून जागा मासे आणि भाजीपाला विक्रेत्यांना उपलब्ध करून दिली जाईल, असे आश्वासन दिले आहे.

# 'राजर्षी शाहू महाराजांनी आखून दिलेली वाट अधिक व्यापक केली पाहिजे'

**नवी मुंबई : बातमीदार**

शिक्षणामुळेच माणसाचा उत्कर्ष होतो हा ठाम विश्वास ठेवत राजर्षि छत्रपती शाहू महाराज यांनी कोल्हापूर संस्थानामध्ये सक्तीचा व मोफत शिक्षणाचा क्रांतिकारी कायदा केला आणि त्याची प्रभावी अंमलबजावणी केली. त्याचाच विस्तार सर्वदूर झालेला असून छत्रपती शाहू महाराजांचा हा शैक्षणिक दृष्टीकोन आपण समजून घेतला पाहिजे व त्यांनी आखून दिलेली वाट अधिक व्यापक केली पाहिजे, असे मत व्याख्याते अभिजित कांबळे यांनी व्यक्त केले.

राजर्षी छत्रपती शाहू महाराज जयंतीचे औचित्य साधून से.१५ ऐरोली येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारकात 'विचारवेध' या व्याख्यान शृंखलेमध्ये 'राजर्षि छत्रपती शाहू महाराज यांचे दूरदृष्टीचे शैक्षणिक विचार' या विषयावर बीबीसी मराठीचे संपादक तथा व्याख्याते अभिजित कांबळे यांनी श्रोत्यांशी संवाद साधत छत्रपती शाहू महाराजांच्या शैक्षणिक विचारांचे महत्त्व विशद केले.



भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या शिक्षण, वाचन, माहिती व ज्ञान यांना महत्व देणाऱ्या विचारांवर आधारित नवी मुंबई महानगरपालिकेने उभे केलेले हे स्मारक खऱ्या अर्थाने ज्ञानस्मारक असून येथील अतिशय ग्रंथालय अभ्यासकांसाठी तसेच बाबासाहेबांचे विचार समजून घेण्यासाठी अतिशय उल्लेखनीय असल्याचे मत अभिजित कांबळे यांनी नोंदविले.

शिक्षण हक्क कायदयाचे अध्वर्यू राजर्षी छत्रपती शाहू महाराज हे असून त्यांनी राबविलेली शैक्षणिक धोरणे, उपक्रम हे आजच्या काळालाही सुसंगत असून त्यांच्या शैक्षणिक विचारांचा उपयोग आजच्या काळात कसा करून घेता येऊ शकतो या दृष्टीने विचारमंथन व्हायला हवे असे ते म्हणाले. शिक्षणामुळे सुजाण व चांगला माणूस घडू शकतो आणि शिक्षण हे समाजाला परस्परांशी सद्भावनेने रहायला शिकवते त्यामुळे शिक्षणाला सर्वाधिक महत्व देण्याची गरज असून त्यासाठी छत्रपती शाहू महाराजांच्या शैक्षणिक विकासाच्या नजरेतून पहायला हवे, असे अभिजित कांबळे यांनी स्पष्ट केले.

व्याख्यानावेळी नमुंमपा आयुक्त डॉ. कैलास शिंदे, बृहन्मुंबई महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त अभिजित बांगर, अतिरिक्त आयुक्त शिरीष आरदवाड, उपआयुक्त संघरत्ना खिल्लारे व किसनराव पलांडे, कार्यकारी अभियंता मदन वाघचौडे, लेट्स रिड फाऊंडेशनचे प्रमुख प्रफुल्ल वानखेडे, सुधाकर सोनवणे, हेमांगी व अंकुश सोनावणे व इतर श्रोते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अफगाणिस्तानची सेमी फायनलमध्ये धडक

## बांगलादेशला हरवत इतिहास घडवला; ऑस्ट्रेलिया वर्ल्डकपबाहेर



**किंग्सटाऊन : वृत्तसंस्था**

अफगाणिस्तान संघाने टी-२० विश्वचषक स्पर्धेच्या सेमीफायनलमध्ये पहिल्यांदाच धडक देत ऐतिहासिक कामगिरी केली आहे. त्यांनी बांगलादेशचा नऊ धावांनी पराभव करीत ऑस्ट्रेलियाला स्पर्धेबाहेर केले आहे.

अफगाणिस्तानने पुन्हा एकदा आपल्या भेदक गोलंदाजीचे प्रदर्शन केले. नवीन उल हकने १८व्या षटकात सलग दोन विकेट्स घेत बांगलादेशला ऑल आऊट केले. अफगाणिस्तानाने प्रथम फलंदाजी करताना पाच बाद ११५ धावा केल्या. सततच्या पावसाने या सामन्यात मोठा व्यत्यय आणला. सामन्याच्या सुरुवातीपासूनच पावसाचा लपंडाव सुरू होता, तर वाराही सामन्यात व्यत्यय आणत होता. त्यामुळे सामन्याचे एक षटक कमी करण्यात आले आणि लक्ष्य ११४ धावांचे करण्यात आले, पण बांगलादेश संघ १७.५ षटकांत गारद झाला.

बांगलादेशकडे अफगाणिस्तानने दिलेल्या ११६ धावा १२.१ षटकांत पूर्ण करीत सेमी फायनल गाठण्याची मोठी संधी होती, पण अफगाणिस्तान कडवी झुंज देत मैदानात होता. रशीद खानने चार विकेट्स घेत बांगलादेशला अडवले, तर अफगाणिस्तानने अखेरच्या षटकांमध्ये चांगली गोलंदाजी करीत आणि झटपट विकेट्स घेत बांगलादेशवर दबाव टाकला. दोन्ही संघांमध्ये विजयासाठी अटीतटीची लढत सुरू होती. बांगलादेशला १८ चेंडूंत १६ धावांची आवश्यकता होती. गुलबदीनने १७व्या षटकात अवघ्या चार धावा दिल्या. तर १८वे षटक नवीन उल हकने तिसऱ्या चेंडूवर तस्कीनला क्लीन बोल्ड केले, तर चौथ्या चेंडूवर मुस्तफिजूरला पायचीत करीत अफगाणिस्तानला ऐतिहासिक विजय मिळवून दिला.

बांगलादेश संघ अवघ्या १०५ धावाच करू शकला. अफगाणिस्तानच्या भेदक गोलंदाजीसमोर फलंदाज जास्त काळ मैदानात टिकू शकले नाहीत. बांगलादेशकडून एकट्या लिटन दासने ४९ चेंडूंत एक षटकार आणि पाच चौकारांच्या मदतीने ५४ धावा केल्या. सौम्या सरकारने १० आणि हृदयने १४ धावा केल्या. याशिवाय इतर सर्व फलंदाज एकेरी धावसंख्येवर माघारी परतले. अफगाणिस्तानकडून नवीन उल हक आणि रशीद खानने प्रत्येकी चार विकेट्स घेतल्या, तर गुलबदीन आणि फजलहकने प्रत्येकी एक विकेट मिळवली.

तत्पूर्वी प्रथम फलंदाजी करताना अफगाणिस्तानची फलंदाजी बाजू ढासळली. सलामीवीर रहमानुल्ला गुरबाज वगळता कोणत्याही फलंदाजाला मोठी धावसंख्या उभारता आलेली नाही. गुरबाजने ५५ चेंडूंत एक षटकार आणि तीन चौकारांसह ४३ धावा केल्या. इब्राहिम झादरानने १८, अझमतुल्लाने १०, गुलबदीनने चार, नबी एक, करीम सात धावा करून बाद झाला. यानंतर रशीद खानने १९ धावा केल्या. यासह अफगाणिस्तानने पाच विकेट्स गमावत ११५ धावा केल्या. बांगलादेशकडून रशीद हुसेनने सर्वाधिक तीन विकेट्स घेतल्या, तर तस्कीन व मुस्तफिजूरने प्रत्येकी एक गडी बाद केला.

# विश्वचषकाच्या उपांत्य फेरीचे चित्र स्पष्ट

## द. आफ्रिका-अफगाणिस्तान, भारत-इंग्लंड भिडणार

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

यंदाचा टी-२० विश्वचषक आता अंतिम टप्प्यात पोहचला आहे. २० संघांमधून सुपर ८ सामने खेळत आता टॉप चार संघही निश्चित झाले आहेत, जे उपांत्य फेरीत भिडतील. अफगाणिस्तानने बांगलादेशवर शानदार आणि ऐतिहासिक विजय मिळवून उपांत्य फेरीत प्रवेश केला आणि ऑस्ट्रेलियाला स्पर्धेतून बाहेरचा रस्ता दाखवला आहे. यासोबतच आता सर्वांना सेमी फायनलची प्रतीक्षा आहे.

टी-२० विश्वचषकात आता चार संघ विजेतेपदाचे दावेदार आहेत, यामध्ये पहिल्या गटातील भारत आणि अफगाणिस्तानचा, तर दुसऱ्या गटातील इंग्लंड आणि दक्षिण आफ्रिका संघ सेमी फायनलमध्ये पोहचले आहेत. द. आफ्रिका आणि इंग्लंडने आधीच त्यांची जागा बुक केली होती. यानंतर भारताने ऑस्ट्रेलियाचा पराभव करून आपले स्थान निश्चित झाले. मग अफगाणिस्तानने बांगलादेशला रोमहर्षक सामन्यात मात देत सेमी फायनलचे तिकिट पक्के केले.




अफगाणिस्तान-बांगलादेश सामन्यावर तीन संघांच नशीब अवलंबून होते. हा सामना संपण्यापूर्वी अफगाणिस्तान, बांगलादेश आणि ऑस्ट्रेलियाचे संघही उपांत्य फेरीचे दावेदार होते, पण सर्वांना झुगारून देत अफगाणिस्तानने बांगलादेशचा केवळ पराभव करण्यातच यश मिळविले नाही, तर प्रथमच उपांत्य फेरीत प्रवेश केला. पहिल्या गटात भारत अग्रस्थानी आणि अफगाणिस्तान दुसऱ्या स्थानी आहे. दुसऱ्या गटात दक्षिण आफ्रिका पहिल्या स्थानी आहे, पण सेमी फायनलसाठी प्रथम इंग्लंडचा संघ पात्र ठरला होता.

### अशा होतील लढती

- सेमी फायनल १ : दक्षिण आफ्रिका वि. अफगाणिस्तान, २७ जून सकाळी ६ वाजता - त्रिनिदाद
- सेमी फायनल २ : भारत वि इंग्लंड, २७ जून रात्री ८ वाजता - गयाना
- अंतिम सामना : २९ जून, सेमी फायनल १चा विजेता वि. सेमी फायनल २चा विजेता, संध्याकाळी ६ वाजता - बार्बाडोस

# न्यूयॉर्कच्या टाईम्स स्क्वेअरमध्ये विराट कोहलीचा पुतळा

**न्यूयॉर्क : वृत्तसंस्था**

भारतीय क्रिकेट संघाचा विस्फोटक फलंदाज विराट कोहलीची बॅट टी-२० विश्वचषकात शांत आहे, पण त्याचा चाहता वर्ग जगभरात मोठ्या प्रमाणावर आहे. आता विराटचा एक पुतळा न्यूयॉर्कमधील टाईम्स स्क्वेअर येथे उभारण्यात आला आहे. त्याच्या या भल्यामोठ्या पुतळ्याचे फोटो, व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे.



विराट कोहलीचा हा पुतळा मॅट्रेस कंपनीच्या प्रचार मोहिमेचा भाग आहे, ज्याचा विराट सदिच्छादूत आहे. त्यांनी हा व्हिडीओ शेअर केला आहे. विराट टी-२० विश्वचषकात त्याची बॅट फारशी तळपत नसली तरी गेल्या दशकापासून त्याची फलंदाजी चर्चेत आहे. विराटने आपल्या फलंदाजीच्या जोरावर क्रिकेट जगतातील महान खेळाडूंमध्ये आपले स्थान निर्माण केले आहे.

सोशल मीडियावर व्हायरल होत असलेल्या व्हिडीओमध्ये विराटचा मोठा पुतळा टाईम्स स्क्वेअरच्या मध्यभागी असल्याचे स्पष्टपणे दिसत आहे. एका व्हिडीओमध्ये विराट बॅट धरून उभा असल्याचे दिसून येते.

# युरो कप : जर्मनीची स्वित्झर्लंडशी बरोबरी; हंगेरीचा स्कॉटलंडविरुद्ध विजय

**फ्रँकफर्ट, स्टुटगार्ट : वृत्तसंस्था**

युरो अजिंक्यपद फुटबॉल स्पर्धेतील अ गटात अखेरच्या साखळी सामन्यात अगदी शेवटच्या मिनिटापर्यंत चुरस पहायला मिळाली. जर्मनी विरुद्ध स्वित्झर्लंड आणि हंगेरी विरुद्ध स्कॉटलंड या दोन्ही सामन्यांचे निकाल ९० मिनिटांनंतरच्या भरपाई वेळेतच लागले. राखीव खेळाडू निक्लस फुलक्रुगने ९२व्या मिनिटाला केलेल्या गोलमुळे जर्मनीने स्वित्झर्लंडला १-१ असे बरोबरीत रोखले. दुसरीकडे केव्हिन सोबोथने सामन्याच्या अगदी अखेरच्या किकवर १००व्या मिनिटाला गोल करून हंगेरीला स्कॉटलंडविरुद्ध १-० असा विजय मिळवून दिला.

जर्मनीने यापूर्वीच बाद फेरीतील स्थान निश्चित केले होते, मात्र साखळी फेरीत अपराजित राहण्याचे त्यांचे ध्येय होते. त्यांचे हे ध्येय फुलक्रुगने अगदी मोक्याच्या वेळी अचूक हेडर मारून केलेल्या गोलमुळे साध्य झाले. या बरोबरीने जर्मनीने गटात अग्रस्थान मिळवले. स्वित्झर्लंडचा आक्रमकपटू डॅन एन्डोयेने पूर्वार्धात २८ मिनिटाला संघाला अनपेक्षित आघाडी मिळवून दिली. यानंतर सामन्यात जर्मनीचे वर्चस्व



राहिले. निर्विवादपणे त्यांनी आपल्या खेळाचा प्रभाव पाडला होता. गोलकक्षात सातत्याने धडक मारणाऱ्या जर्मनीला रोखण्यासाठी अनेकदा स्वित्झर्लंडच्या खेळाडूंनी धोकादायक प्रयत्न केले. प्रत्येक वेळेस जर्मनीने पेनल्टीसाठी अपील केले, पण इटालियन पंच डॅनिएल ओर्साटो यांनी अपील फेटाळून लावली.

जर्मनीचा एक गोलही अपात्र ठरविण्यात आला. सामन्यात गोलजाळीच्या दिशेने तब्बल १८ फटके मारल्यानंतरही जर्मनीच्या पदरी फुलक्रुगच्या अचूक हेडरपर्यंत निराशाच पडली होती. डाव्या बाजूने आलेल्या क्रॉसवर स्वित्झर्लंडच्या दोन बचावपटूंनी घेरल्यानंतरही फुलक्रुगने सारी क्षमता पणाला लावून हेडरने चेंडूला गोलजाळीची दिशा दिली. त्यामुळे जर्मनीला बरोबरी साधता आली.

दुसरीकडे सामन्याच्या तब्बल १००व्या मिनिटाला गोल करून हंगेरीने स्कॉटलंडचा १-० असा पराभव केला. या पराभवाने स्कॉटलंडचे स्पर्धेतील आव्हान संपुष्टात आले, तर हंगेरीच्या सर्वोत्तम तिसरा संघ म्हणून बाद फेरी गाठण्याच्या आशा कायम आहेत.

पूर्वार्धात चेंडूवर ६१ टक्के वेळ ताबा राखूनही स्कॉटलंडला गोलजाळीच्या दिशेने एकही किक मारता आली नाही. पहिल्या अर्ध्या तासाच्या खेळानंतर मात्र स्कॉटलंडचा खेळ खालावला. हंगेरीने आघाडीसाठी बरेच प्रयत्न केले. भरपाई वेळेच्या पहिल्याच मिनिटाला डॉमिनिक सोबोझ्लाईचा प्रयत्न स्कॉटलंडचा गोलरक्षक ॲन्गस गनने परतवून लावला. पुढच्याच मिनिटाला सोबोथची किक गोलपोस्टला धडकून बाहेर गेली. दोन्ही संघांकडून कमालीचा वेगवान खेळ झाला. स्कॉटलंडच्या मॅकटोमिनेने घसरत चेंडूला गोलजाळीची दिशा देण्याचा प्रयत्न केला, पण चेंडू बाहेर गेला. अखेर ही बरोबरीची कोंडी १००व्या मिनिटाला फुटली.













